रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १९ • अंक ३८
www.ramprahar.com

• सोमवार, २४ ऑगस्ट २०२६ • पाने ८ • किंमत ₹२




# खारघर हिलवर धावपटूंचा महासागर

## नऊ हजार स्पर्धकांनी गाजवली महापौर मॅरेथॉन | देशातील पहिली ४२ किमी हिल मॅरेथॉन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**खारघर हिल महापौर मॅरेथॉन ही देशातील पूर्ण ४२ किमी असणारी पहिली हिल मॅरेथॉन रविवारी (दि. २३) विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाली. आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त एआयएमएस प्रमाणकामुळे मॅरेथानला महत्त्व प्राप्त झाले असून पुढील वर्षापासून जागतिक मान्यता मिळून देश-विदेशातील धावपटू आकर्षित होतील. या मॅरेथॉनमुळे पनवेल पालिकेची राष्ट्रीय व जागतिक स्तरावर स्वतंत्र ओळख निर्माण होईल, जी पनवेलकरांसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे.**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या खारघर हिल महापौर मॅरेथॉनला पनवेलकरांसह संपूर्ण महाराष्ट्रातून धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. देशातील पूर्ण ४२ किमी अंतराची पहिली हिल मॅरेथॉन म्हणून विशेष महत्त्व प्राप्त झालेल्या या स्पर्धेत सुमारे नऊ हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

पहाटे ४.३० वाजता आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, मुख्य प्रवर्तक परेश ठाकूर, जिल्हाधिकारी किशन जावळे, आयपीएस अधिकारी कृष्णप्रकाश, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, आयुक्त मंगेश चितळे, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता म्हात्रे, प्रभाग समिती ‘अ’चे सभापती रवींद्र भगत, महापालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी आणि सुप्रसिद्ध अभिनेता अंकुश चौधरी, राजकीय पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत झेंडा दाखवून मॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली.

४२ किमी पूर्ण मॅरेथॉनसह २१ किमी अर्ध मॅरेथॉन, १० किमी धावणे, पाच किमी धावणे आणि तीन किमी आनंद दौड अशा विविध प्रकारांना मान्यवरांनी झेंडा दाखवून सुरुवात केली. आजवर आतापर्यंत अशी मॅरेथॉन पनवेलमध्ये झाली नव्हती. या ऐतिहासिक मॅरेथॉनमुळे पुढील वर्षापासून जागतिक मान्यता मिळून देश-विदेशातील धावपटू आकर्षित होतील.

(पान २...)

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)




### दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र स्पर्धा

महापौर नितीन पाटील व सभागृहनेते प्रकाश बिनेदार यांच्या पुढाकाराने मॅरेथॉनमध्ये दिव्यांगांसाठी स्वतंत्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामुळे दिव्यांगांनाही मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. १०० दिव्यांग बांधवांनी या विशेष मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविला. दिव्यांग बांधवांनी या विशेष मॅरेथॉनचे आयोजन केल्याबद्दल पनवेल महापालिकेचे आभार मानले. बालकांपासून ज्येष्ठांपर्यंत विविध वयोगटांनी सहभाग नोंदविला.

### आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त

एआयएमएस प्रमाणपत्र मिळाल्यामुळे या मॅरेथॉनला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे नऊ हजार धावपटूंच्या सहभागामुळे या स्पर्धेने पनवेल महानगरपालिकेची राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख निर्माण करण्यास हातभार लावला आहे. पनवेलकरांसाठी ही निश्चितच अभिमानाची बाब ठरली आहे.

### सुप्रसिद्ध अभिनेते अंकुश चौधरींची उपस्थिती

खारघर हिल महापौर मॅरेथॉनला सुप्रसिद्ध अभिनेते अंकुश चौधरी यांनीदेखील विशेष उपस्थिती लावली होती. मॅरेथॉनच्या सुरुवातीला झेंडा दाखवून त्यांनी स्पर्धकांना प्रोत्साहन दिले. या मॅरेथॉनसाठी महापालिकेने मोठ्या प्रमाणात डॉक्टर्स, फिजिओथेरपिस्ट आणि ॲम्ब्युलन्सची सोय केली होती.

## निवडक

### दोन निष्पाप चिमुरड्यांना गळफास देऊन आईचीही आत्महत्या

**कोल्हापूर :** हातकणंगले तालुक्यातील जयसिंगपुरात आईने दोन निष्पाप चिमुरड्यांना गळफास देऊन स्वतःही आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. संगीता गाडीवडर असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव असून प्रगती गाडीवडर (४ वर्षे) व प्रतीक गाडीवडर (दीड वर्षे) अशी मृत निष्पाप मुलांची नावे आहेत.

### संरक्षणात भारताची झेप; स्वदेशी एके-२०३ रायफलची निर्मिती

**नवी दिल्ली :** स्वदेशी संरक्षण उत्पादन क्षेत्रात भारताने महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ‘मेक इन इंडिया’ अंतर्गत अमेठीतील कोरवा आयुध निर्मिती प्रकल्पात पहिली १०० टक्के स्वदेशी एके-२०३ असॉल्ट रायफल यशस्वीपणे तयार करण्यात आली. तिची प्राथमिक चाचणीही घेण्यात आली. या रायफलला ‘शेर’ नाव देण्यात आल्याची माहिती मेजर जनरल एस. के. शर्मा यांनी दिली.


## महाराष्ट्रात कोचिंग क्लासेसवर आता सरकारचा लगाम

### २५ विद्यार्थ्यांपासून नोंदणी बंधनकारक

**मुंबई : प्रतिनिधी**

नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणात १३ पैकी नऊ आरोपी महाराष्ट्रातील आणि लातूर-पुणे केंद्रस्थानी असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने खासगी कोचिंग नियमनाचा मसुदा जाहीर केला असून २५ पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या प्रत्येक सेंटरला नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या महाराष्ट्र खासगी कोचिंग सेंटर (नोंदणी आणि नियमन) विधेयक, २०२६च्या मसुद्यानुसार डमी स्कूल म्हणजेच शाळा आणि कोचिंगचे इंटिग्रेशन, तळघरातील क्लासेस आणि गुन्हा दाखल असलेल्या व्यक्तीची नियुक्ती यावर बंदी घालण्यात आली आहे.

उल्लंघन करणाऱ्या शाळेची मान्यता रद्द करण्याची शिफारस केली जाणार आहे. हा कायदा झाल्यास तो राजस्थान, झारखंड, आसाम, हरियाणा या चार राज्यांपेक्षा अधिक कठोर



ठरेल, कारण राजस्थानमध्ये १०० व आसाममध्ये ५०पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना हा कायदा लागू आहे. कार्यरत क्लासेसनी सहा महिन्यांत ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करावी. नोंदणी तीन वर्षांसाठी वैध असेल. महिन्याचे सीसीटीव्ही फुटेज व अग्निसुरक्षा प्रमाणपत्र बंधनकारक असेल.

## युवकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याला प्राधान्य -मुख्यमंत्री

### रेशीमबाग मैदानावर २५ हजार युवकांचा मंथन सोहळा

**नागपूर : प्रतिनिधी**

शिक्षण, कौशल्य, क्रीडा आणि स्टार्टअप क्षेत्रात युवा पिढीचा सकारात्मक सहभाग असून तो वाढविण्याला प्राधान्य देण्यात येईल, तसेच स्टार्टअप इकोसिस्टीममध्ये चर्चा करून चांगली पॉलिसी तयार करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. २३) येथे दिली. रेशीमबाग मैदानावर मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत ‘मंथन फॉर युवा’ उपक्रमांतर्गत ढोल-ताशा पथकाचा जागतिक विक्रम, विविध क्षेत्रातील आयकॉन व्यक्तींसोबत थेट संवाद आणि नशामुक्त महाराष्ट्र व देशासाठी युवकांना शपथ आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी २५ हजारांपेक्षा जास्त युवक-युवतींनी सहभाग नोंदविला. महाराष्ट्राची परंपरा असलेल्या ढोलताशा पथकाने एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियामध्ये जागतिक विक्रम नोंदविला आहे.



आधार नोंद असलेल्या ५८५ ध्वजधारकांच्या समावेशामुळे हा विक्रम झाला असून यापूर्वी २६० ध्वजधारकांचा विक्रम मोडीत निघाला आहे. मुख्यमंत्र्यांनी संपूर्ण चमूचे अभिनंदन केले.

क्रीडा समालोचक रिधिमा पाठक यांनी मुख्यमंत्री फडणवीस, क्रिकेटपटू तिलक वर्मा, राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते दिलीप महादू गावित, अर्जुन देशपांडे, किरण शहाजी यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या कार्याची प्रेरणा व अनुभव युवकांसमोर मांडण्यात आले. मुख्यमंत्री म्हणाले की, संविधानामुळेच लोकशाही प्रगल्भ झाली आहे. त्यामुळेच मला नगरसेवक, महापौर, आमदार आणि मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचणे शक्य झाले. स्टार्टअपसाठी इकोसिस्टीम पॉलिसी तयार करण्यात आली असून त्यात युवकांना शंभर टक्के मदत करण्याचा उद्देश आहे. युवकांशी चर्चा करून आणखी चांगली पॉलिसी तयार करण्यात येईल.

## ‘कॅम्पस कनेक्ट’ रील स्पर्धेत रामशेठ ठाकूर महाविद्यालय अव्वल

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील एसवाय बीएससीसीएस वर्गातील विद्यार्थी जयेश नेरुळकर व त्याच्या टीमने प्रथम नवी मुंबई पोलिसांच्या ‘कॅम्पस कनेक्ट’ उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या रील मेकिंग स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांच्या सर्जनशीलतेला, टीमवर्कला आणि सामाजिक विषयांकडे पाहण्याच्या सकारात्मक दृष्टिकोनाला विशेष दाद मिळत आहे. या स्पर्धेत जयेश नेरुळकरसोबत रेहान मिर्दे, ईशान परमार, मोहम्मद ताहा मुकादम, मनीष शेवाळे, सिद्रा शेख आणि श्रुती कानोजिया यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या स्पर्धेतील विजेत्या टीमला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले, ही संपूर्ण महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.




मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान मिळणे ही विद्यार्थ्यांच्या यशाला विशेष प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी बाब ठरली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासासोबतच विविध स्पर्धा, सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक व सर्जनशील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा यासाठी त्या सातत्याने प्रेरणा व प्रोत्साहन देत असतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि कौशल्यांना व्यापक व्यासपीठ मिळत आहे. रिजवाना मोमीन मॅडम यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सहकार्याबद्दलही विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

(पान २...)

## आंध्रच्या कोळसा खाणीतून रायगडच्या ३९ कातकरी बांधवांची मुक्तता

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आंध्र प्रदेशातील कोळसा उद्योगात वेठबिगारीत अडकलेल्या रायगडच्या ३९ कातकरी बांधवांची सुखरूप सुटका करण्यात आली. माणगाव तालुक्यातील कोशिंबळे, हरणेवाडी आणि खरवली परिसरातील महिला, पुरुष आणि बालकांचा यात समावेश आहे. रायगड प्रशासन, सर्वदीप विकास संस्था, अंकुर ट्रस्ट आणि इंटरनॅशनल जस्टिस मिशन यांच्या समन्वयातून ही कारवाई झाली.

लग्न, सण आणि आजारपणाच्या आणीबाणीच्या वेळी शेतीकामाच्या मोबदल्यात परतफेड करण्याच्या बोलीवर या कुटुंबांना आगाऊ रक्कम देण्यात आली होती, मात्र त्यांना आंध्र प्रदेशातील गोरन्ट्ला येथील दुर्गम जंगल भागात कोळसा खाणीत नेण्यात आले. तेलुगू येत नसल्याने ते असहाय्य झाले. त्यांच्याकडून दीर्घकाळ काम करून घेणे, मारहाण, भीती दाखवणे तसेच पाणी, अन्न आणि निवाऱ्याची अत्यंत हालाखीची परिस्थिती होती. यातून दोन मजूर शिताफीने पळून सर्वदीप विकास संस्थेशी संपर्क साधण्यात यशस्वी झाले.

## राष्ट्रीय अंतराळदिनी पंतप्रधान मोदींकडून शास्त्रज्ञांचे कौतुक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चांद्रयान-३च्या ऐतिहासिक यशाला तीन वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना आणि इस्रोच्या शास्त्रज्ञांना शुभेच्छा देत भारताचे अंतराळ क्षेत्र आता जागतिक गुंतवणूकदारांसाठी आकर्षणाचे केंद्र बनल्याचा दावा केला आहे. भारतात दरवर्षी २३ ऑगस्ट हा राष्ट्रीय अंतराळ दिन म्हणून साजरा केला जातो. २३ ऑगस्ट २०२३ रोजी चांद्रयान-३ मोहिमेतील विक्रम लँडरने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग केले होते.

या ध्रुवीय प्रदेशात पोहोचणारा भारत पहिला देश ठरला होता. या यशानंतर पंतप्रधान मोदींनी राष्ट्रीय अंतराळ दिनाची घोषणा केली होती. आजच्या दिवशी एक व्हिडीओ शेअर करत पंतप्रधान म्हणाले की, ही बदलाच्या नव्या युगाची सुरुवात आहे. भारत जागतिक प्रणालीत आपली अंतराळ उपस्थिती वाढवत आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यात अंतराळ क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावेल. भारत आज सेमी क्रायोजेनिक इंजिन आणि इलेक्ट्रिक प्रोपल्शनसारख्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानात झपाट्याने प्रगती करत आहे. या क्षेत्रातील भारतीय प्रतिभा जागतिक स्तरावरही आपली छाप पाडत आहे.

# गावापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत आता मानकांनुसार आरोग्यसेवा

## रुग्णालयनिहाय सुविधा निश्चित; आरोग्य व्यवस्थेत पारदर्शकता

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांना त्यांच्या गरजेनुसार दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने रुग्णालयनिहाय आरोग्यसेवांची सर्वसमावेशक मानके निश्चित केली आहेत. ग्रामीण रुग्णालयापासून उपजिल्हा, सामान्य आणि जिल्हा रुग्णालयापर्यंत कोणत्या स्तरावर कोणत्या आरोग्य सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर, तपासण्या, मनुष्यबळ, औषधे आणि पूरक सेवा उपलब्ध असाव्यात, याची स्पष्ट रूपरेषा निश्चित करण्यात आल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे.

मंत्री आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील आरोग्यसेवा अधिक सुसूत्र आणि परिणामकारक होण्यास मदत होणार आहे. नागरिकांना आपल्या गरजेनुसार योग्य आरोग्य संस्थेची निवड करणे सुलभ होणार असून, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील पारदर्शकता आणि नागरिकांचा विश्वास आणखी दृढ होणार आहे.



ग्रामीण रुग्णालयापासून ३०, ५० व १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालय अशा विविध स्तरांवर उपलब्ध होणाऱ्या सेवांचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. रुग्णालयाची क्षमता आणि सेवा स्तर लक्षात घेऊन तज्ज्ञ वैद्यकीय सेवा, नर्सिंग, अलाइड हेल्थ व पॅरामेडिकल मनुष्यबळ, प्रयोगशाळा, रेडिओलॉजी आणि इतर रुग्णसेवांची उपलब्धता निश्चित करण्यात आली आहे.

फिजिशियन, सर्जन, स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, अस्थिव्यंग तज्ज्ञ, नेत्रशल्यचिकित्सक, भूलतज्ज्ञ, रेडिओलॉजिस्ट, दंतशल्यचिकित्सक आदी तज्ज्ञ सेवांचा रुग्णालयाच्या स्तरानुसार समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आवश्यक उपचार स्थानिक पातळीवरच उपलब्ध करून देण्यास चालना मिळणार असून, रुग्णांना उपचारासाठी दूरच्या शहरांकडे जाण्याची गरज कमी होणार आहे.

नागरिकांना आवश्यक तपासण्या स्थानिक पातळीवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी निदानात्मक सेवांचेही स्पष्ट मानक निश्चित करण्यात आले आहे. ग्रामीण रुग्णालयांमध्ये ७६, १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयांमध्ये ११०, तर जिल्हा रुग्णालयांमध्ये १२२ प्रकारच्या निदानात्मक चाचण्यांची उपलब्धता निश्चित करण्यात आली आहे. यामुळे या तीन स्तरांवर मिळून ३०८ प्रकारच्या निदानात्मक चाचण्यांबाबत स्पष्टता झाली आहे. रक्तातील साखर, हिमोग्लोबिन, विविध रक्त तपासण्या, यकृत व मूत्रपिंड कार्य तपासण्या, लिपिड प्रोफाइल, HbA१C, थायरॉईड, पॅप स्मिअर तसेच विविध संसर्गजन्य आजारांच्या तपासण्यांचा यामध्ये समावेश आहे.

रुग्णालयाच्या स्तरानुसार एक्स-रे आणि सोनोग्राफीसारख्या रेडिओलॉजी सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. १०० खाटांपेक्षा अधिक क्षमतेच्या रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅन, तर जिल्हा रुग्णालय स्तरावर एमआरआय सुविधेचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. यामुळे गंभीर आजारांचे निदान अधिक वेगाने आणि अचूक पद्धतीने करण्यास मदत होणार असून, नागरिकांना आधुनिक निदान सुविधांचा लाभ शासकीय आरोग्य व्यवस्थेतच मिळणार आहेत.

गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेसाठी डॉक्टरांसोबत प्रशिक्षित नर्सिंग आणि पॅरामेडिकल मनुष्यबळाचे रुग्णालयनिहाय निकष निश्चित करण्यात आले आहेत. प्रयोगशाळा तंत्रज्ञ, ईसीजी तंत्रज्ञ, क्ष-किरण तंत्रज्ञ, रक्तपेढीतील मनुष्यबळ, आहारतज्ज्ञ, भौतिकोपचार तज्ज्ञ, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते आणि मनोरुग्ण सामाजिक कार्यकर्ते आदींचा यामध्ये समावेश आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातूनही सार्वजनिक आरोग्य संस्थांना अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामध्ये १११ सुपर स्पेशालिस्ट, १,५१९ स्पेशालिस्ट, २,९१९ वैद्यकीय अधिकारी, ३,००५ आयुष वैद्यकीय अधिकारी आणि ११,५७१ स्टाफ नर्स यांचा समावेश आहे.

रुग्णालयाच्या स्तरानुसार अत्यावश्यक औषधांची यादी आणि आवश्यक औषधसाठ्याचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यामुळे रुग्णांना उपचाराच्या वेळी आवश्यक औषधे उपलब्ध करून देण्यासाठी अधिक प्रभावी नियोजन करता येणार आहे.

रुग्णालयनिहाय मानकांमध्ये केवळ डॉक्टर आणि निदानात्मक सेवांचाच समावेश नसून रक्तपेढी व रक्त संक्रमण केंद्र, डायलिसिस, आयुष सेवा, लसीकरण कक्ष, माता-बाल आरोग्य सेवा आणि प्रसूती कक्ष यांसारख्या महत्त्वाच्या सुविधांचाही समावेश करण्यात आला आहे.रुग्णवाहिका, दिव्यांग प्रमाणपत्र, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र, डिस्चार्ज प्रमाणपत्र, जन्म-मृत्यू नोंदणी, जननी सुरक्षा योजनेचा लाभ, आहार सुविधा आणि तक्रार निवारण व्यवस्था अशा नागरिकाभिमुख सेवांनाही महत्त्व देण्यात आले आहे.

"नागरिकाला कोणत्या रुग्णालयात कोणती सेवा मिळणार, कोणते तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध असतील, कोणत्या तपासण्या होतील आणि कोणत्या सुविधा उपलब्ध असतील, याची स्पष्ट माहिती मिळणार असल्याने नागरिकांचा शासकीय आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल," असा विश्वास सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला.

## हिरानंदानी फॉर्च्यून सिटीत लोखंडी पाईप डोक्यावर पडल्याने कामगाराचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भोकरपाडा परिसरातील - हिरानंदानी फॉर्च्यून सिटी गृहप्रकल्पाच्या साईटवर काम करत असताना डोक्यावर लोखंडी पाईप पडून गंभीर जखमी झालेल्या एका कामगाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. हबीबूर बहारुद्दीन रहमान (वय ५१, रा. बारीओल, पो. छोघरा, जि.कटिहार, बिहार) असे मृत पावलेल्या कामगाराचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हबीबूर रहमान हे हिरानंदानी फॉर्च्यून सिटी येथे बांधकाम साईटवर काम करत होते. काम सुरू असताना अचानक त्यांच्या डोक्यावर एक लोखंडी पाईप पडल्याने ते गंभीर जखमी झाले. अपघात घडताच त्यांना तातडीने उपचारासाठी कामोठे येथील एमजीएम (MGM) रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मात्र, रुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्यांची प्रकृती अधिक खालावली आणि उपचारादरम्यान हबीबूर बहारुद्दीन रहमान यांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेची नोंद रसायनी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत.

## चंदेरी किल्ल्यावर रस्ता चुकलेल्या तीन तरुणांची सुखरूप सुटका



**पनवेल : वार्ताहर**

चंदेरी किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या तीन तरुणांचा डोंगरात रस्ता चुकल्याने ते भरकटले. मदतीसाठी त्यांनी ११२ क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून तिन्ही तरुणांना सुखरूपपणे गडाच्या पायथ्याशी आणले.

वावंजे बिट निर्भया एमडीटीवर सकाळी ११.०८ वाजता चंदेरी किल्ल्यावर काही जण अडकले असून त्यांना पोलीस मदतीची आवश्यकता असल्याचा कॉल प्राप्त झाला. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंद कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश मोकाशी, पोलीस हवालदार अमर भालसिंग आणि पोलीस नाईक मिलिंद जाधव घटनास्थळी रवाना झाले.

ओम खिलारी, पार्थ कडवे आणि रूषिल वृंदावन हे तिघेही कामोठे, पनवेल येथील रहिवासी असून ते चंदेरी किल्ला, तामसई येथे ट्रेकिंगसाठी आले होते. मात्र, डोंगरातील वाट चुकल्याने ते हरवले. पोलिसांनी रिटघर गावचे पोलीस पाटील दीपक पाटील तसेच सह्याद्री प्रतिष्ठान पनवेलचे दुर्गसेवक गौरव दरवडा, मयूर टकले आणि आदेश पाडेकर यांच्या मदतीने शोधमोहीम राबवली.

काही वेळातच तिन्ही तरुणांचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले. त्यांना सुरक्षितपणे गडाच्या पायथ्याशी आणण्यात आले. चौकशीत ते सकाळी ८ वाजता पनवेलहून ट्रेकिंगसाठी आल्याचे स्पष्ट झाले. डोंगरात रस्ता चुकल्याने त्यांनी ११२ वर मदतीसाठी कॉल केला होता. पोलिसांनी तिघांना आवश्यक ती मदत करून त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला. त्यांच्या वडिलांना दूरध्वनीद्वारे घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांच्या तत्परतेमुळे तीनही तरुण सुखरूप बचावले.

## चरई खुर्द ग्रामपंचायतीचा अभ्यास दौरा ठरला चालना देणारा



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील चरई खुर्द ग्रामपंचायतीचा अभ्यास दौरा मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायत वडवळ व तांबाटी या खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायतीना भेट दिली.

वडवळ तांबाटी ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा, टीबी मुक्त ग्रामपंचायत, आर. आर. आबा स्मार्ट ग्राम, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान आदी विविध शासकीय उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून पुरस्कार प्राप्त केलेली आहेत. या पार्श्वभूमीवर वडवळ ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची, नावीन्यपूर्ण उपक्रमांची तसेच लोकसहभागातून राबविण्यात आलेल्या उपक्रमांची पाहणी करून त्याबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली.

याअभ्यास दौऱ्यात सरपंच ज्ञानेश्वर सुतार, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद पाटील, कर्मचारी आदींनी अभ्यास दौऱ्यातील पथकाला ग्रामपंचायतीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने बोलताना ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्दचे सरपंच प्रविण आंबार्ले म्हणाले की, "आपल्या जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायतींनी उत्कृष्ट काम केले आहे, त्या ग्रामपंचायतींना भेट देऊन त्यांच्या कार्याचे कौतुक करणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या यशस्वी संकल्पना आत्मसात करणे, हा या अभ्यास दौऱ्यामागील मुख्य उद्देश आहे. तसेच आपल्या ग्रामपंचायतीमध्येही या अभ्यासातून मिळालेल्या अनुभवांचा उपयोग करून नवीन व नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

या अभ्यास दौऱ्यात सरपंच प्रविण आंबार्ले, उपसरपंच अजय सावंत, लक्ष्मण भोईर, दिनेश भोईर, रश्मी आंबार्ले, जयश्री सकपाळ, सायली भोईर, ग्रामपंचायत अधिकारी राजेश खैरे व विजय आंबार्ले सहभागी झाले होते. हा अभ्यास दौरा चरई खुर्द ग्रामपंचायतीच्या आगामी विकासासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## पालकमंत्री भरत गोगावले यांना राखी बांधण्यासाठी अलोट गर्दी; अनोखे रक्षाबंधन

**महाड : प्रतिनिधी**

भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा आणि विश्वासाचा धागा अधिक घट्ट करणाऱ्या रक्षाबंधनाचा सण महाडमध्ये रविवारी अक्षरशः भावनांचा महासागर घेऊन आला. महाडचे आमदार, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांच्या ढालकाठी येथील 'शिवनेरी' निवासस्थानी शिवसेना महिला आघाडी महाड विधानसभा यांच्या वतीने आयोजित भव्य रक्षाबंधन सोहळ्यास तब्बल दहा हजारांहून अधिक लाडक्या बहिणींनी उपस्थिती लावत आपल्या लाडक्या भावाला राखी बांधली.

गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेली ही प्रेमाची परंपरा यंदा अधिकच व्यापक आणि भावनिक झाली. सकाळपासूनच शिवनेरी निवासस्थानाकडे भगिनींचे लोंढेच्या लोंढे येत होते. शिवनेरीपासून खरवली फाट्यापर्यंत लाडक्या बहिणींची लागलेली लांबच लांब रांग हा या सोहळ्याचा विशेष आकर्षणाचा विषय ठरला.

यंदा भरतशेठ गोगावले यांच्यावर रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्यात आल्याने सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. महाड-माणगाव-पोलादपूर मतदारसंघासह रायगड जिल्ह्याच्या विविध भागांतून भगिनी मोठ्या संख्येने या सोहळ्यासाठी दाखल झाल्या.सोहळ्यासाठी आलेल्या प्रत्येक भगिनीचे गोगावले कुटुंबीयांकडून मनापासून स्वागत करण्यात आले. सुषमाताई गोगावले, साधनाताई गोगावले, शितल गोगावले, कोमल गोगावले यांच्यासह गोगावले कुटुंबीय तसेच महाड विधानसभा मतदारसंघातील महिला व पुरुष पदाधिकारी स्वतः प्रत्येक भगिनीची विचारपूस करीत होते.प्रत्येक बहिणीला प्रेमाची भेट, नाश्ता आणि पाण्याची बाटली देण्यात आली. त्यामुळे हजारोंच्या गर्दीतही प्रत्येक भगिनीला आपलेपणाची जाणीव होत होती.

यावेळी बोलताना पालकमंत्री भरतशेठ गोगावले भावूक झाले. "माझ्या लाडक्या बहिणींनी माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि दिलेला पाठिंबा हीच माझी खरी ताकद आहे. याच बहिणींच्या आशीर्वादामुळे मला चार वेळा आमदार म्हणून निवडून येण्याची संधी मिळाली. त्यानंतर मंत्री आणि आता रायगडचा पालकमंत्री म्हणून काम करण्याची जबाबदारी मिळाली," असे त्यांनी सांगितले.या बहिणींनी माझ्यावर जो विश्वास ठेवला आहे, तो मी कधीही विसरणार नाही. त्यांच्या अडीअडचणीच्या काळात हा भाऊ त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील अशी भावनिक ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.





## पान १ वरुन

### खारघर हिलवर धावपटूंचा महासागर

या मॅरेथॉनमुळे पनवेल महानगरपालिकेची राष्ट्रीय व जागतिक स्तरावर एक स्वतंत्र ओळख निर्माण झाली असून ही पनवेलकरांसाठी अभिमानाची गोष्ट ठरली आहे.

नियमित धावण्याची सवय लागावी, नागरिकांचे आरोग्य उत्तम राहावे आणि युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृती रुजावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही मॅरेथॉन क्रीडाप्रेमींसाठी पर्वणी ठरली. स्थानिक, ग्रामीण आणि निमशहरी भागातील धावपटूंना आपल्या परिसरातच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाली. यामुळे नागरिकांमध्ये उत्साह निर्माण होण्याबरोबरच पनवेल परिसरातील पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळण्यास मदत झाली. नवी मुंबईचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे, माजी आयुक्त सुधाकर देशमुख, ठाण्याचे सहायक पोलीस आयुक्त आदिनाथ बुधावर, उपजिल्हाधिकारी राहुल सूर्यवंशी, युवराज बनगर, ठाणे पोलीस उपायुक्त शैलेश काळे, उपायुक्त मनपा जयंत जावडेकर, एमएमआरडीएचे वरिष्ठ अधिकारी, विविध शासकीय आस्थापनांतील अधिकारी, खासगी कंपन्यांचे अधिकारी अशा विविध वरिष्ठ अधिकारी धावपटूंनीदेखील या मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविला.

तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि शिक्षकांनीही मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदविला. या मॅरेथॉनमध्ये सुमारे नऊ हजार स्पर्धक सहभागी झाले. यामध्ये तीन आणि पाच किमीच्या धावण्याच्या प्रकारांना सर्वाधिक प्रतिसाद मिळाला.

विशेष म्हणजे २१ किमी अर्ध मॅरेथॉनमध्ये नऊ अंध धावपटूंनी सहभाग घेत आपल्या जिद्दीचे दर्शन घडविले.

**मॅरेथॉनचे मार्ग**

३ किमी : सेंट्रल पार्क-ग्रामविकास भवन-विश्वज्योत प्रीस्कूल यू-टर्न ग्रामविकास भवन-सेंट्रल पार्क.
५ किमी : सेंट्रल पार्क-ग्रामविकास भवन-मुर्बी मेट्रो स्थानक यू-टर्न ग्रामविकास भवन-सेंट्रल पार्क.
१० किमी : सेंट्रल पार्क-ग्रामविकास भवन-उत्सव चौक-बेलपाडा मेट्रो स्थानक-आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानक यू-टर्न बेलपाडा मेट्रो स्थानक-उत्सव चौक-ग्रामविकास भवन-सेंट्रल पार्क.
२१ किमी : सेंट्रल पार्क-आरबीआय कॉलनी-मेट्रो स्थानक-चाफेवाडी मेट्रो स्थानक-उत्सव चौक ग्रामविकास भवन-उत्सव चौक-बेलपाडा मेट्रो स्थानक-फणसवाडी यू-टर्न आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानक-बेलपाडा सेंट्रल पार्क.
४२ किमी : सेंट्रल पार्क-ग्रामविकास भवन-मुर्बी जंक्शन यू-टर्न ग्रामविकास भवन-उत्सव चौक- बेलपाडा मेट्रो स्थानक-आरबीआय कॉलनी-मेट्रो स्थानक-चाफेवाडी फणसवाडी यू-टर्न आरबीआय कॉलनी मेट्रो स्थानक-बेलपाडा मेट्रो स्थानक-उत्सव चौक-गोल्फ कोर्स रोड यू-टर्न ग्रामविकास भवन- गुरुद्वारा रांजणपाडा-खारघर फुटबॉल स्टेडियम तळोजा जेल रोड-टाटा मेमोरियल सेंटर यू-टर्न तळोजा जेल रोड खारघर फुटबॉल स्टेडियम रांजणपाडा-मुर्बी जंक्शन-विबग्योर शाळा यू-टर्न मुर्बी जंक्शन-रांजणपाडा-गुरुद्वारा सेंट्रल पार्क.

### 'कॅम्पस कनेक्ट' रील स्पर्धेत रामशेठ ठाकूर महाविद्यालय अव्वल

जयेश नेरुळकर आणि त्याच्या संपूर्ण टीमचे हे यश महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरले आहे. सर्जनशीलता, संघभावना, आत्मविश्वास आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर विद्यार्थी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करू शकतात हे या यशातून अधोरेखित झाले आहे. महाविद्यालयाच्या वतीने विजेत्या टीमचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

## भाजप राज्य ओबीसी कार्यकारिणीवर मनोज म्हात्रे

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप ओबीसी मोर्चाच्या संघटन विस्तारात मनोज म्हात्रे यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. भाजप ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर यांनी म्हात्रे यांची 'महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य' तसेच 'मुंबई संपर्क प्रमुख' या पदांवर नियुक्ती केली आहे.

आपल्या निवडीबद्दल बोलताना मनोज म्हात्रे यांनी सांगितले की, ओबीसी समाजाच्या कल्याणासाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ते सदैव



कार्यरत राहतील. मोफत MPSC व UPSC प्रशिक्षणाचा लाभ गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे तसेच परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती आणि फेलोशिप योजनांचे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना मदत करणे या विषयांवर ते भर देणार आहेत.

# पनवेल-कर्जत रेल्वेमार्गावरील कामांना वेग

## ■ ऑक्टोबरमध्ये सेवा सुरू होण्याची शक्यता

**पनवेल : वार्ताहर**

बहुप्रतीक्षित पनवेल-कर्जत रेल्वे मार्गावरील कामांना आता वेग आला असून, या मार्गावर प्रवासी रेल्वे सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने रेल्वे प्रशासनाकडून तयारीला वेग आल्याचे चित्र आहे. पनवेल रेल्वे स्थानकात कर्जतच्या दिशेने धावणाऱ्या रेल्वेगाड्यांसाठी स्वतंत्र फलाट उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे पनवेल-कर्जत रेल्वे सेवेच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रवाशांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.



पनवेल स्थानक परिसरात नव्या फलाटाचे काम वेगाने सुरू असून, प्रवाशांसाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणीही करण्यात येत आहे. नव्या पादचारी पुलाचे काम जवळपास पूर्ण झाले असून, त्यावर छत उभारण्याचे काम सुरू आहे. तसेच स्थानकात ये-जा करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी स्वयंचलित जिने बसविण्याचे कामही सुरू झाले आहे.

पनवेल-कर्जत रेल्वे मार्गामुळे पनवेल, कर्जत तसेच परिसरातील ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या या भागातील प्रवाशांना विविध मार्गांचा वापर करून प्रवास करावा लागत असल्याने पनवेल-कर्जत थेट रेल्वे सेवेची मोठी प्रतीक्षा आहे.

पनवेल स्थानकातील सुरू असलेल्या कामांची प्रगती पाहता रेल्वे सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक तयारीला वेग आल्याचे दिसून येत आहे. ऑक्टोबरपर्यंत स्थानकातील संबंधित कामे पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, त्यानंतर पनवेल-कर्जत रेल्वे सेवा सुरू होण्याच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

नवीन रेल्वे सेवा सुरु झाल्यास पनवेल-कर्जत प्रवास अधिक सुलभ आणि जलद होण्याबरोबरच या भागातील दळणवळण व्यवस्थेला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे या मार्गाच्या पूर्णत्वाकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

## गाडीची काच फोडून लॅपटॉप, रोख रक्कम चोरली

**नवीन पनवेल :** फुटपाथवर पार्क केलेल्या कारची काच फोडून लॅपटॉप, रोख रक्कम असा ३६ हजारांचा ऐवज चोराने चोरून नेला. या प्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात २२ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. स्वप्निल घाटगे हे तकका रोड, पनवेल येथे राहत असून त्याने त्याच्या मित्राच्या कारमधील पाठीमागील सीटवर लॅपटॉप बॅगेमध्ये रोख रक्कम आणि लॅपटॉप ठेवला होता आणि कार सेक्टर २०, कळंबोलीच्या फुटपाथवर पार्क केली होती. अज्ञाताने गाडीची काच फोडून लॅपटॉप आणि रोख रक्कम, पॅन कार्ड, आधार कार्ड चोरून नेले.

## १३ लाखांची फसवणूक, दोघांविरोधात गुन्हा

**नवीन पनवेल :** पोलीस अधिकारी बोलत असल्याचे ओळख सांगून फिर्यादी यांना घरात बंदिस्त केले आणि त्यांच्या बँकेतून दुसऱ्या बँकेत १३ लाख रुपये जमा करण्यास भाग पाडून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २१ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी प्रशांत पाठक हे सेवानिवृत्त असून सेक्टर ११, नवीन पनवेल येथे राहतात. त्यांना मोबाईल क्रमांक वरून भारतीय डेटा सेंटर मधून पोलीस अधिकारी बोलत असल्याचे सांगितले आणि तुमच्या विरोधात गुन्हा दाखल असून अटक करण्याची त्यांना धमकी दिली.

# मोदक-पुरणपोळी महोत्सव ठरला सक्षमीकरणाचा नवा अध्याय; महिला उद्योजकतेची भरारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने शनिवार दिनांक २२ ऑगस्ट रोजी विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे आयोजित'मोदक व पुरणपोळी महोत्सव२०२६'ला पनवेलकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महोत्सवाचे उद्‌घाटन प्रमुख पाहुण्या उपमहापौर प्रमिला पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममताताई प्रितम म्हात्रे होत्या. या महोत्सवाला महिला उद्योजिकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.या महोत्सवात सुमारे ५० महिला गृहउद्योजिकांनी सहभाग घेत विविध प्रकारचे मोदक, पुरणपोळ्या तसेच घरगुती उत्पादनांचे स्टॉल्स उभारले.





महोत्सवाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यापूर्वी कधीही घराबाहेर पडून स्वतंत्रपणे व्यवसाय न केलेल्या अनेक महिलांनी प्रथमच स्वतःचा स्टॉल लावून व्यवसाय करण्याची संधी मिळाली. ग्राहकांशी थेट संवाद साधणे, स्वतःच्या उत्पादनांची विक्री करणे आणि भविष्यातील ऑर्डर्स मिळविणे, हा अनुभव या महिलांचा आत्मविश्वास वाढविणारा ठरला.

> **महिला व बालकल्याण या विभागाच्या प्रमुख 'महिला' आणि 'बालक' या दोन्ही घटकांना एकाच व्यासपीठावर संधी मिळावी, हा आमचा प्रयत्न आहे. गृहीणींच्या कौशल्याला व्यवसायाची जोड मिळावी आणि विशेष मुलांच्या कलागुणांना समाजाकडून प्रोत्साहन मिळावे, यासाठी यापुढेही असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील.**
>
> **-ममता प्रितम म्हात्रे, सभापती, महिला व बालकल्याण समिती**

सहभागी महिला उद्योजिकांनी या संधीबद्दल पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीचे आभार व्यक्त केले. महिलांच्या कौशल्याला व्यावसायिक स्वरूप देऊन त्यांना स्वावलंबनाकडे नेण्यासाठी हा स्तुत्य उपक्रम राबविण्याचा पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी सभापती ममताताई प्रितम म्हात्रे यांचे विशेष आभार मानले.

महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या मोदकपुरणपोळी महोत्सवाचा पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महिला उद्योजकींना नक्कीच उपयोग होणार आहे. या महोत्सवास महिला व बालकल्याण विभाग प्रमुख कविता मोकल व डेएनयुएलएम विभागाच्या व्यवस्थापक विन्या म्हात्रे यांचे सहकार्य लाभले.

# भावना महिंद्राच्या बीई ६ इलेक्ट्रिक कारचे पनवेलमधील ओरियन मॉलमध्ये शानदार अनावरण

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

भावना महिंद्रा'च्या वतीने महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीच्या बहुप्रतिक्षित बीई ६ या अत्याधुनिक आणि हाय-टेक इलेक्ट्रिक कारचे भव्य अनावरण पनवेल येथील ओरियन मॉलमध्ये उत्साहात पार पडले.




या सोहळ्याला महापौर नितीन पाटील, सभापती अजय बहिरा, नगरसेवक गणेश कडू, सुमित झुंजारराव, नगरसेविका प्रीती जॉर्ज म्हात्रे, रुचिता लोंढे, भावना महिंद्रा, नेरूळचे राजेश शहा आणि अपर्णा शहा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात बोलताना महापौर नितीन पाटील यांनी इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापराचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत देशात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वेगाने वाढत असून विक्री २५ टयांपर्यंत पोहोचली आहे. वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरण वाचवणे आणि इंधनावरील खर्च कमी करणे ही आजच्या काळाची मुख्य गरज आहे. महिंद्राने सुरक्षेची उत्तम वैशिष्ट्ये असलेली बीई ६ ही कार बाजारात आणून ग्राहकांसाठी एक उत्कृष्ट पर्याय उपलब्ध करून दिला आहे." त्यांनी भावना महिंद्रा आणि संपूर्ण टीमला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, भावना महिंद्रा नेरूळचे मालक राजेश शहा यांनी कारच्या तंत्रज्ञानावर प्रकाश टाकताना सांगितले, "१५ ऑगस्ट रोजी महिंद्रा अँड महिंद्राने या हाय-टेक स्पोर्टी कारचे जागतिक स्तरावर अनावरण केले होते. बीई ६ ही कार अत्यंत प्रगत तंत्रज्ञानाने सज्ज आहे. या कारमध्ये बसूनच गाडीच्या तसेच घरातील स्मार्ट उपकरणांचे नियंत्रण करता येते. ही कार भारतीय ऑटोमोबाईल क्षेत्रातील एक मोठी क्रांती ठरेल आणि ग्राहकांना इलेक्ट्रिक वाहनांकडे वळण्यासाठी नक्कीच आकर्षित करेल.

## ट्रकच्या धडकेत तरुण गंभीर जखमी

**नवीन पनवेल :** रस्ता क्रॉस करत असताना ट्रक चालकास थांबवण्यासाठी हात दाखवला असता त्याने न थांबता बावीस वर्षीय तरुणाला धडक देऊन झालेल्या अपघातात तरुण गंभीर जखमी झाला. या अपघाताप्रकरणी आयशर कंपनीच्या ट्रक चालका विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात २१ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. जतिन सोनी हा रोडपाली, कळंबोली येथे राहत असून २० ऑगस्ट रोजी दुपारी चारच्या सुमारास पुरुषार्थ ब्रिज कळंबोली येथून वाशीच्या दिशेने रस्ता क्रॉस करत असताना रोडपाली सिग्नलच्या दिशेने ट्रक भरधाव वेगाने येताना दिसला. यावेळी त्याने ट्रक चालकास थांबवण्यासाठी हात दाखवला. मात्र त्याने न थांबता जतीन सोनी याला धडक दिली. आणि त्याच्या दोन्ही पायांवरून ट्रक गेल्याने ी गंभीर दुखापत झाली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता विषयावर मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात तंत्रज्ञान विभागाच्या वतीने मंगळवार ( दि. १८) रोजी सकाळी ११ वाजता टी वाय बी एस सी. आय टी व एस वाय बी एस सी आय टीच्या विद्यार्थ्यांसाठी फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅमच्या अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हे व्याख्यान एमजीएम कॉलेज कामोठे यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले.

या व्याख्यानामध्ये विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मूलभूत संकल्पना, आधुनिक तंत्रज्ञानातील त्याचे महत्त्व तसेच विविध क्षेत्रांमधील AI चे उपयोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना विषय अधिक प्रभावीपणे समजावा यासाठी व्याख्यानामध्ये विविध उदाहरणे, व्यावहारिक दृष्टिकोन आणि दैनंदिन जीवनातील AI च्या वापराशी संबंधित माहिती देण्यात आली.व्याख्यानादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध संकल्पना समजून घेतल्या. विद्यार्थ्यांनी संपूर्ण सत्रात उत्सुकता व एकाग्रता दाखवून व्याख्यानाचा लाभ घेतला.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना या आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी हे व्याख्यान अत्यंत उपयुक्त ठरले. सदर कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना विविध तज्ज्ञांचे ज्ञान व अनुभव मिळण्यास मदत होत असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानात तसेच व्यावसायिक कौशल्यांमध्ये भर पडत आहे. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे तसेच माहिती व तंत्रज्ञान विभाग प्रमुख प्रा. राजश्री म्हात्रे यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम घेण्यात आला तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मी उपस्थित राहून सहकार्य केले.

# संवेदनाच्या 'घागर घुमू दे' सोहळ्यात रंगला स्त्रीशक्तीचा जागर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संवेदना चॅरिटेबल संस्था, पनवेल यांच्या वतीने आयोजित "घागर घुमू दे" या मंगळागौर विशेष सोहळ्याचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यंदाच्या कार्यक्रमाची संकल्पना "नवदुर्गा ते नवशक्ती स्त्री सामर्थ्याचा प्रवास" अशी होती.

मंगळागौरच्या पारंपरिक खेळांना आधुनिक स्त्रीशक्तीच्या विचाराशी जोडत, महिलांच्या कला, उत्साह, आत्मविश्वास आणि सामर्थ्याचे विविध पैलू या कार्यक्रमातून सादर करण्यात आले. फुगडी, गोफ, झिम्मा, ताक घुसळणे, पाणी लाटा, करवंटी झिम्मा, आंबा पिकतो, होडी, अगीनगाडी यांसह विविध पारंपरिक खेळ आणि कलाविष्कारांनी कार्यक्रमात रंगत आणली.

"परंपरा जपूया आणि नवशक्तीला जागवू या" या विचारातून संवेदना संस्थेच्या वतीने गेल्या १७ वर्षांपासून मंगळागौरच्या माध्यमातून महिलांना एकत्र आणण्याचे आणि पारंपरिक खेळ व संस्कृती जपण्याचे कार्य केले जात आहे. यंदाच्या कार्यक्रमालाही महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे परीक्षण स्मिता धारप आणि ऐश्वर्या सोमण यांनी परीक्षक केले.विविध खेळ व सादरीकरणांचे बारकाईने परीक्षण करून त्यांनी विजेत्यांची निवड केली.



कार्यक्रमादरम्यान सहभागी महिलांच्या उत्साहाला प्रोत्साहन देत विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक वेशभूषा, गाणी, नृत्य, खेळ आणि सामूहिक सहभागामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय झाले. कार्यक्रमाच्या माध्यमातून स्त्री ही केवळ परंपरेची वाहक नसून, ती सर्जनशीलता, कर्तृत्व, आत्मविश्वास आणि सामर्थ्याची मूर्तिमंत ओळख आहे, हा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध खेळांमध्ये उत्कृष्ट सहभाग व सादरीकरण करणाऱ्या महिलांचे विशेष कौतुक करण्यात आले. तसेच उत्कृष्ट खेळ करणाऱ्या महिलेला "संवेदना श्रावण क्वीन २०२६" या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षीचा "संवेदना श्रावण क्वीन २०२६" हा मानाचा पुरस्कार मेधा गाडगीळ यांना प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहभागी झालेल्या सर्व महिला, परीक्षक, सहकारी आणि संवेदना संस्थेच्या कार्यकर्त्यांचे संस्थेच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# कळंबोली केएल ४ परिसरातील झाडांच्या फांद्यांची केली छाटणी

## नगरसेविका बायजा बारगजे यांच्या माध्यमातून नागरिकांना दिलासा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील केएल ४ परिसरात वाढलेल्या झाडांच्या फांद्यांमुळे नागरिक, वाहनचालक तसेच व्यापारी वर्गाला होत असलेला त्रास लक्षात घेऊन नगरसेविका बायजा बबन बारगजे यांच्या माध्यमातून झाडांची आवश्यक छाटणी करून घेण्यात आली.



केएल ४ परिसरातील अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या रस्त्यावर तसेच विद्युत वाहिन्यांच्या दिशेने वाढल्या होत्या. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला होता. नागरिकांनी ही बाब नगरसेविका बायजा बारगजे यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तत्काळ संबंधित विभागाशी संपर्क साधून कार्यवाही करून घेतली.

या कामाच्या वेळी भाजपा नेते बबन बारगजे यांनी प्रत्यक्ष ठिकाणी दिवसभर उपस्थित राहून परिसरातील नागरिक महेंद्र खबाले, वैभव फाळके तसेच व्यापारी वर्गासोबत कामाची पाहणी केली. महानगरपालिकेचे सुपरवायझर आतिश चौधरी यांच्या समन्वयाने झाडांच्या छाटणीचे काम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष ठिकाणी सहकार्य केले. झाडांच्या छाटणीच्या कामासाठी आवश्यक असलेली वाहने व इतर साधनसामग्री घटनास्थळी आणण्यासाठी तसेच कामाच्या ठिकाणी अडथळा निर्माण करणारी वाहने हटविण्यासाठीही बबन बारगजे यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यामुळे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना काम करणे सुलभ झाले आणि छाटणीचे काम वेळेत पूर्ण करण्यात आले.

या कामामुळे केएल-४ परिसरातील रस्ते व पादचारी मार्ग मोकळे झाले असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे तसेच विद्युत वाहिन्यांच्या जवळील वाढलेल्या फांद्यांचा धोका कमी झाल्याने परिसरातील सुरक्षिततेतही सुधारणा झाली आहे. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित राहून काम करून घेण्याला प्राधान्य देत असून परिसरातील नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी यापुढेही सातत्याने प्रयत्न केले जातील.

## संपादकीय

# नशामुक्तीचा संकल्प

अमली पदार्थांचे वाढते जाळे ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची समस्या नसून तरुणाईच्या भविष्याशी निगडित गंभीर सामाजिक आव्हान आहे. नवी मुंबई पोलिसांच्या 'कॅम्पस कनेक्ट' उपक्रमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याचा घेतलेला पुढाकार हा नशामुक्त समाजाच्या दिशेने आश्वासक पाऊल आहे.

**अमली पदार्थांचे सेवन ही आजच्या काळातील अत्यंत गंभीर सामाजिक समस्या बनत चालली आहे. विशेषतः तरुणाईला लक्ष्य करून अमली पदार्थांचे जाळे विस्तारत असल्याने त्याचे परिणाम केवळ एखाद्या व्यक्तीपुरते मर्यादित राहत नाहीत; तर कुटुंब, समाज आणि देशाच्या भवितव्यावर त्याचा परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने 'नशामुक्त नवी मुंबई' अभियान अंतर्गत सुरू केलेला 'कॅम्पस कनेक्ट' उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या उपक्रमाचा झालेला शुभारंभ आणि विद्यार्थ्यांना करण्यात आलेले आवाहन यामुळे या मोहिमेला व्यापक दिशा मिळाली आहे. महाविद्यालयीन जीवन हा युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. याच काळात अनेक तरुण आपल्या करिअरची दिशा निश्चित करतात, नव्या संधींचा शोध घेतात आणि आयुष्याची स्वप्ने पाहतात, मात्र कुतूहल, मित्रांचा दबाव, ताणतणाव, चुकीची संगत किंवा सहज उपलब्धता अशा विविध कारणांमुळे काही तरुण अमली पदार्थांच्या विळख्यात अडकतात. सुरुवातीला 'फॅशन' किंवा 'प्रयोग' म्हणून सुरू झालेली सवय पुढे व्यसनात रूपांतरित होऊ शकते. त्यामुळे व्यसन सुरू झाल्यानंतर त्यावर उपाय करण्यापेक्षा व्यसन सुरूच होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक जनजागृती करणे अधिक परिणामकारक ठरते. 'कॅम्पस कनेक्ट'ची नेमकी गरज याच ठिकाणी अधोरेखित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी भारताच्या 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चा उल्लेख करताना देशातील मोठ्या युवाशक्तीला भारताची ताकद म्हटले आहे. ही ताकद राष्ट्राच्या विकासासाठी वापरली गेली, तर भारताच्या प्रगतीला अभूतपूर्व वेग मिळू शकतो, परंतु हीच युवाशक्ती व्यसनाधीन झाल्यास त्याचा फटका केवळ त्या तरुणाला बसत नाही, तर देशाच्या मानवी संपत्तीचेही नुकसान होते. त्यामुळे अमली पदार्थांविरोधातील लढाई ही केवळ पोलिसांची जबाबदारी मानून चालणार नाही. त्यात पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, आरोग्य यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वयं तरुणाई यांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. अमली पदार्थांविरोधातील लढाईत दोन आघाड्यांवर काम करणे गरजेचे आहे. एकीकडे अमली पदार्थांची तस्करी, वितरण आणि पुरवठा करणाऱ्या साखळीवर कठोर कारवाई झाली पाहिजे. दुसरीकडे त्याची मागणी कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण जनजागृती केली पाहिजे. केवळ पोलिसांची धडक कारवाई करून समस्या कायमची संपणार नाही. एखादा पुरवठादार पकडला जाईल, मात्र मागणी कायम राहिली तर दुसरा मार्ग शोधला जाईल. म्हणूनच 'मागणीमुक्ती' हा या लढाईचा केंद्रबिंदू ठरला पाहिजे. यासाठी महाविद्यालयीन कॅम्पस हे जनजागृतीचे प्रभावी माध्यम ठरू शकते. व्याख्याने, संवाद सत्रे, पोस्टर स्पर्धा, लघुपट, रील्स, चर्चासत्रे, समुपदेशन आणि क्रीडा उपक्रम यांच्या माध्यमातून तरुणांशी थेट संवाद साधता येईल. नशेचे दुष्परिणाम सांगतानाच त्यांना शिक्षण, क्रीडा, कला, कौशल्यविकास, स्टार्टअप, संशोधन आणि सामाजिक कार्य यांसारखे सकारात्मक पर्याय उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.**

# हातमाग, विणकरांच्या विकासासाठी शासन कटिबद्ध






राज्यात परंपरागत व्यवसाय व कलांच्या विकासासाठी व संवर्धनासाठी राज्य शासन संवेदनशीलपणे कार्य करीत आहे. वस्त्रोद्योग व यात कार्यरत सर्व हातमाग व विणकरांच्या विकासालाही शासनाने प्राधान्य दिले आहे. वस्त्रोद्योग विभागाद्वारे केंद्र शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून कापड स्पर्धा व विविध प्रकारे अर्थ सहाय्यही करण्यात येत आहे. राज्य शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नागपूर स्थित आयुक्तालय यात अग्रेसर ठरले आहे.

वस्त्रोद्योग आयुक्तालयाद्वारे केंद्र पुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून हातमाग क्षेत्राचा विकास साधण्यात येत आहे. केंद्र पुरस्कृत सर्वसमावेशक हातमाग विकास योजना ही यातील प्रमुख असून या योजनेमध्ये आतापर्यंत बऱ्याच योजनांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेचा एक भाग म्हणून ३० मार्च २०१७ पासून राज्यात पैठण, येवला, मोहाडी, पाचगांव व सोलापूर या पाच ठिकाणी ब्लॉक लेव्हल हॅण्डलूम क्लस्टर मंजूर करण्यात आले. या क्लस्टरद्वारे राज्यातील ५४० लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. तसेच ८४ लाभार्थ्यांना लाईटींग युनिट तर ५९ लाभार्थ्यांना वर्कशेड देण्यात आले.

केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्यामध्ये स्मॉल क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेखाली ५ क्लस्टर मंजूर करण्यात आले आहेत. यापैकी ४ विदर्भातील असून नागपूर जिल्ह्यातील २ क्लस्टरचा यात समावेश आहे. नागपूर जिल्ह्यात तांडापेठ येथे १ कोटी ८ लाख ८४ हजार किंमतीचे क्लस्टर मंजूर झाले असून या अंतर्गत १२० लाभार्थी येतात. नागपूर जिल्ह्यातीलच धापेवाडा येथे १ कोटी २४ लाख ९४ हजार किंमतीचे क्लस्टर मंजूर झाले आहे व यातंर्गत ९३ लाभार्थी येतात. अमरावती जिल्ह्यातील अचलपूर येथे १ कोटी २५ लाख ३४ हजार किंमतीचे क्लस्टर मंजूर झाले असून १३२ लाभार्थ्यांचा यात समावेश आहे. अकोला जिल्ह्यातील बाळापूर येथे १ कोटी १६ लाख २९ हजार किंमतीचे क्लस्टर मंजूर होवून त्याचा १०८ लाभार्थ्यांना लाभ होणार आहे. नाशिक जिल्ह्यातील नागडे येथे ७५ लाख २१ हजारांचे क्लस्टर मंजूर होवून १८३ लाभार्थ्यांना फायदा होणार आहे.

केंद्र शासनाने २०१८-१९ मध्ये देशभर केलेल्या चौथ्या हातमाग गणनेनूसार राज्यातील ४ प्रादेशिक उपायुक्त कार्यालयांतर्गत ३ हजार ५०९ विणकर तर ३ हजार ३५४ हातमाग असल्याची नोंद झाली आहे. नागपूर प्रादेशिक विभागात ३१७ हातमाग तर ४०१ विणकर आहेत. सोलापूर प्रादेशिक विभागात ४७३ हातमाग तर ५४८ विणकरांची नोंद झाली आहे. छत्रपती संभाजी नगर प्रादेशिक विभागात २६२ हातमग तर ४३० विणकर आहेत. मुंबई प्रादेशिक विभागात सर्वाधिक २ हजार ३०२ हातमाग तर २ हजार १३० विणकर असल्याचेही या गणनेतून दिसून येत आहे.

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नागपूर आयुक्तालयाच्यावतीने राज्यशासन अर्थसहय्यीत योजना राबवून हातमाग व विणकरांच्या विकासासाठी कार्य करण्यात येते. याअंतर्गत एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरणांतर्गत विविध विकास योजना तसेच बक्षीस योजना अतिरिक्त अनुदान योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, हातमाग कापड स्पर्धा, जाहिराती व प्रसिध्दी योजना आदी प्रभावीपणे राबविण्यात येतात.

राज्यातील हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्याकरिता व विणकरांनी उत्पादित केलेल्या उत्कृष्ट वाणाला वाव मिळावा या उद्देशाने सर्व गटातील हातमाग विणकरांकरिता नागपूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर व मुंबई या चार ठिकाणी विभागीय हातमाग कापड स्पर्धा आयोजित करुन बक्षीस व प्रशस्तीपत्र देण्यात येते. विभागीय स्पर्धेतील बक्षीसपात्र नमुन्यासाठी राज्यस्तरीय हातमाग कापड स्पर्धा आयोजित करण्यात येते. आणि विणकरांना बक्षीसे व प्रशस्तीपत्र पदान करण्यात येते. वर्ष २०२३-२४ ची विभागीय स्पर्धा नागपूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर येथे तर राज्यस्तीय स्पर्धा मुंबई येथे आयोजित करण्यात आली. या स्पर्धेतील विजेत्यांना ४.५० लाखांची बक्षीसे प्रदान करण्यात आली.

राज्यातील विणकर,रेशीम उद्योग व हातमागाच्या विकासासाठी वस्त्रोद्योग विभागाने एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ जाहीर केले आहे. तसा शासन निर्णयही निर्गमित करण्यात आला आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टिने वस्त्रोद्योग आयुक्तालयाने केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. 'अर्बन हाट केंद्र' ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यातील विणकर आणि हस्तकलांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणारी योजना राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यात प्रमुख ठिकाणी 'अर्बन हाट केंद्र' स्थापीत करण्यासाठी प्रकल्प किंमतीच्या ८० टक्के हिस्सा केंद्र शासनाकडे तर उर्वरित २० टक्के हिस्सा राज्य शासन वहन करणार आहे. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ नागपूर येथे अर्बन हट उभारणीसाठी राज्य शासनाने ११ जुलै २०२५ अन्वये मान्यता दिली आहे. मंजूरीसाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

२०० युनिट पर्यंत हातमाग विणकरांना मोफत वीज, कच्चा माल पुरवठा योजनेंतर्गत हातमाग विणकरांना अतिरिक्त अनुदान देण्यात येते. या योजनेमध्ये केंद्र व राज्याकडून प्रत्येकी १५ टक्के सवलत देण्याची तरतूद आहे. सदर अनुदान हे कॉटन हँक धागा, घरगुती रेशीम, लोकरी आणि लीनन धागा आणि नैसर्गिक तंतुच्या मिस्त्रीत धाग्यावरच देण्यात येते. वर्ष २०२४-२५ मध्ये १०३७ लाभार्थ्यांना ९६ लाख ३७ हजार रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले.

केंद्राप्रमाणे राज्य शासनाकडूनही हातमाग विणकर, रेशीम उद्योग विकासासाठी योजना तयार करण्यात आल्या असून वस्त्रोद्योग आयुक्तालय व रेशीम संचालनालयाच्याकडून त्याची अंमलबजावणी करण्यात येते. हातमाग विणकर कुटुंबांना प्रती महिना २०० युनिटपर्यंत मोफत वीज अनुदान देणारी 'मोफत वीज अनुदान योजना' आयुक्तालयाच्यावतीने राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत एकूण १०६३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे. वर्ष २०२३-२४ मध्ये ६६० लाभार्थ्यांच्या वीज अनुदानापोटी महावितरण मुंबईला वस्त्रोद्योग आयुक्तालयातर्फे १ कोटी ३० लाख रुपये अदा करण्यात आले. तर वर्ष २०२४-२५ मध्ये ४०३ नवीन लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

राज्यातील हातमागाच्या ५ पारंपरिक वाणांमधील प्रमाणित व नोंदणीकृत विणकरांना प्रोत्साहन देण्याकरिता गणेश चतूर्थी उत्सव भत्ता पुरुष विणकर १० हजार रुपये तर महिला विणकरांना १५ हजार रुपये देण्यात येतो. वर्ष २०२४-२५ मध्ये १८५ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला असून २१९.५० लाख रूपये वितरीत करण्यात आले. राज्यातील पैठणी साडी, हिमरु शाल, करवत काटी, घोंगडी व खणफॅब्रीक या पाच पारंपरिक क्षेत्रामध्ये सर्वोत्कृष्ट डिझाईनला 'पारंपरिक हातमाग विणकरांना बक्षीस योजना' अंतर्गत राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त बक्षीस वितरीत करण्यात येते. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाच्या पुरस्कारासाठी अनुक्रमे २० हजार, १५ हजार आणि १० हजार रुपयांचे रोख रक्कम बक्षीस स्वरुपात देण्यात येते.

हातमाग व विणकरांच्या विकासाकरिता राज्य व केंद्र शासनाच्या योजना आणि धोरणांची अंमलबजावणी करण्याचे कार्य वस्त्रोद्योग आयुक्तालय निष्ठेने पार पाडत आहे. हातमाग व विणकरांच्या सकारात्मक वाटचालीसाठी हे एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

**-रितेश मो. भुयार,**
माहिती अधिकारी, नागपूर



## बदलते तंत्रज्ञान

# 'या' चार समस्या दिसल्यास त्वरित बदला तुमचा स्मार्टफोन

स्मार्टफोन आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे, पण काही वेळा फोनमध्ये तांत्रिक गडबड नसतानाही तो आपल्याला एक 'अलर्ट' देत असतो की,



आता नवीन फोन घेण्याची वेळ आली आहे. जर तुम्ही वेळीच हा इशारा ओळखला नाही, तर तुमचा महत्त्वाचा डेटा गमावणे, सायबर हल्ल्यांना बळी पडणे किंवा ऐन गरजेच्या वेळी फोन बंद पडणे, अशा समस्यांचा सामना करावा लागू शकतो.


फोनची बॅटरी हेल्थ ही तुमचा फोन जुना झाल्याची सर्वात मोठी ओळख आहे. जर तुमचा फोन ४०-५०% चार्ज असताना अचानक १०-२०%वर आला किंवा तुम्हाला दिवसभरात वारंवार फोन चार्ज करावा लागत असेल. याचा अर्थ बॅटरी खराब झाली आहे आणि हे नवीन स्मार्टफोन घेण्याचे स्पष्ट संकेत आहे. खराब बॅटरीमुळे फोन कधीही बंद पडू शकतो.

प्रत्येक कंपनी एका ठराविक काळानंतर जुन्या फोन्सना अपडेट्स देणे थांबवते. काही कंपन्या २-३ वर्षांसाठी, तर सॅमसंग आणि गुगलसारख्या कंपन्या ५-७ वर्षांसाठी अपडेट्स देतात. जर तुमच्या फोनला सिक्युरिटी अपडेट्स मिळणे बंद झाले असतील, तर हा फोन बदलण्याचा सर्वात योग्य काळ आहे. सुरक्षा अपडेट्सशिवाय तुमचा स्मार्टफोन सायबर हल्ल्यांसाठी खूप संवेदनशील बनतो. जुन्या सॉफ्टवेअरमुळे अनेक नवीन ॲप्स नीट चालत नाहीत आणि फोनचा परफॉरमन्सही ढासळतो.

जर तुम्ही फोन वापरत असताना तो अचानक बंद पडत असेल किंवा स्वतःहून रीस्टार्ट होत असेल, तर हा एक मोठा धोक्याचा संकेत आहे. याचा अर्थ तुमचा फोन आता एक्सपायरी डेटच्या जवळ पोहचला आहे आणि लवकरच तो पूर्णपणे बंद पडू शकतो. या परिस्थितीत, तुमचा महत्त्वाचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी तातडीने नवा फोन घेणे अधिक सुरक्षित आहे तसेच जुन्या फोनमधील डेटाचा बॅकअप घेणे विसरू नका.

फोन जुना झाल्यावर त्याची नेटवर्क पकडण्याची क्षमता कमकुवत होते. नेटवर्क पूर्णपणे गायब होणे किंवा सिग्नलची समस्या वारंवार जाणवणे. ॲप्स वारंवार क्रॅश होणे किंवा फोन खूप हँग होणे किंवा स्लो चालणे. हे सर्व संकेत स्पष्टपणे सांगतात की, आता तुमच्या फोनची क्षमता संपली आहे आणि अपग्रेडची वेळ आली आहे. जुन्या प्रोसेसरमुळे ॲप्सचा ताण तो सहन करू शकत नाही. जर तुमच्या फोनमध्ये वरीलपैकी दोन किंवा अधिक समस्या सतत दिसत असतील, तर नवीन फोन घ्या.

# लढवय्ये नेते अरुण जेटली



## निमित्त

माजी केंद्रीय अर्थमंत्री, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ताठ ठेवण्यासाठी आपले कौशल्य पणाला लावणाऱ्या अरुण जेटली यांचा आज स्मृतीदिन आहे. वयाच्या ६६व्या वर्षी दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

२८ डिसेंबर १९५२ रोजी अरुण जेटली यांचा जन्म झाला व दिल्लीतच शिक्षण झाले. विद्यार्थीदशेतच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून युवा नेता म्हणून त्यांनी ओळख मिळवली. वडील पेशाने वकील असल्याने त्यांच्यात तो सभाधीटपणा, वाक्चातुर्य, लढवय्या स्वभाव, नेतृत्व गुण आपोआप आले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सेंट झेवियर्समध्ये झाले. पुढे श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्समधून वाणिज्य शाखेत पदवी संपादन केली. १९७४मध्ये त्यांनी दिल्ली विद्यापिठातून कायदा शाखेतील पदवी मिळवली. दिल्ली विद्यापीठात अभाविपकडून १९७४मध्ये विद्यार्थी नेता म्हणून निवड करण्यात आली. याच काळात त्यांच्यातील नेतृत्व गुण समोर आले आणि त्यांचा त्यांनी विद्यार्थांच्या उत्कर्षासाठी अत्यंत खुबीने वापर केला.

आणीबाणीच्या काळात अरुण जेटली यांनी १९ महिने तुरुंगवास भोगला. १९७३मध्ये राज नारायण आणि जेपी नारायण यांनी भ्रष्टाचाराविरोधात उघडलेल्या मोहिमेत जेटली एक प्रमुख युवा नेते होते. आणीबाणीनंतर तुरुंगातून सुटल्यानंतर अरुण जेटलींनी जनसंघात प्रवेश केला.

चार्टर्ड अकाऊंटंट होण्याची इच्छा असलेले जेटली वकील झाले. सुप्रीम कोर्ट व देशातील विविध हायकोर्टांमध्ये त्यांनी वकिली केली. १९९०मध्ये त्यांना दिल्ली हायकोर्टाने वरिष्ठ वकील म्हणून मान्यता दिली.

व्ही.पी. सिंह सरकारकडून १९८९मध्ये जेटलींची अतिरिक्त सॉलिसिटर जनरल म्हणून निवड करण्यात आली. बोफोर्स घोटाळ्याच्या चौकशीतही त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात आली. जनता दलचे नेते शरद यादव, काँग्रेसचे दिवंगत नेते माधवराव शिंदे आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्यासाठी जेटलींनी वकिलीही केली.

पेप्सिकोविरुद्ध कोकाकोला हे प्रकरणही जेटलींनी हाताळले. कायदेमंत्री असताना जेटलींनी पेप्सीकोसाठी खटला लढवला आणि हिमालयातील रस्त्यांवर जाहिरात करणाऱ्या आठ कंपन्यांना दंड ठोठावण्यात महत्त्वाची भूमिका निभावली.

जेटलींनी २००९मध्ये वकिली थांबवली. राज्यसभेत विरोधी पक्षनेता म्हणूनही त्यांनी काम पाहिले. वाजपेयी यांच्या सरकारमध्ये विविध मंत्रालयांची जबाबदारी सांभाळली. भाजपमध्ये अनेक पदांवर जेटलींनी काम केले. २०१४पर्यंत ते जनतेमधून कोणतीही निवडणूक लढले नव्हते, पण २०१४मध्ये त्यांनी अमृतसरमधून निवडणूक लढले आणि काँग्रेसचे उमेदवार कॅप्टन अमरिंदर सिंह यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. यानंतर त्यांना राज्यसभेवर खासदार म्हणून निवडण्यात आले.

निष्णात वकील असलेले जेटली सभागृहात विरोधकांना तोंड देण्यासाठी एकटेच पुरेसे ठरत असत. मोदी सरकारच्या काळात त्यांनी अर्थमंत्रीपद सांभाळताना अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. २४ ऑगस्ट २०१९ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सकाळचा नाश्ता टाळणे अपायकारक

सकाळी कामाला उशीर होऊ नये म्हणून लोक अनेकदा नाश्ता वगळतात. बऱ्याच वेळा जास्त वेळ झोपण्यासाठी आपण सकाळचा नाश्ता करणे टाळतो. अनेकदा लोकांना असे वाटते की, सकाळचा नाश्ता वगळण्याने कोणतेही विशेष नुकसान होत नाही आणि जरी असे झाले तरी दुपारच्या जेवणात थोडे अधिक खाल्ल्याने आपण ही कमतरता दूर करू शकतो. परंतु, जेव्हा तुम्ही महिनाभर ते सतत वगळले तर काय होते? हे जाणून घेऊयात...



बंगळुरूमधील फोर्टिस हॉस्पिटल्सच्या सल्लागार गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. प्रणव होन्नावरा श्रीनिवासन यांनी या संदर्भात बोलताना सविस्तर माहिती दिली आहे. डॉ. श्रीनिवासन यांनी अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित केलेल्या संशोधनाचा हवाला दिला आहे, ज्यात सूचित केले आहे की, नियमित नाश्ता केल्याने पचनाची समस्या नाहीशी होते. याउलट नाश्ता न केल्यानं टाइप २ मधुमेहाचा धोका वाढतो.

डॉ. श्रीनिवासन म्हणतात, अनेक अभ्यासांनी दीर्घकालीन नाश्ता वगळण्याशी संबंधित संभाव्य दीर्घकालीन आरोग्य धोके ओळखले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**१. मेटाबॉलिक सिंड्रोम :** अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित मेटा-विश्लेषणात असे आढळून आले की, नाश्ता वगळणे हे मेटाबॉलिक सिंड्रोमच्या उच्च जोखमीशी संबंधित आहे, ज्यामुळे हृदयरोग, स्ट्रोक आणि टाइप २ मधुमेहाचा धोका वाढतो.

**२. हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी रोग :** संशोधन असे सूचित करते की, जे लोक नाश्ता वगळतात त्यांना हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकसारख्या हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी घटनांचा धोका जास्त असतो.

**३. टाईप २ मधुमेह :** सार्वजनिक आरोग्य पोषणमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासासह अनेक अभ्यासांनी न्याहारी वगळण्याला टाइप-२ मधुमेह होण्याच्या जोखमीशी जोडले आहे. हा अनियमित खाण्याच्या पद्धतींमुळे होणारा परिणाम आहे.

**४. पौष्टिक कमतरता** : नाश्ता वगळल्याने जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबर यांसारख्या आवश्यक पोषक घटकांचे अपुरे सेवन होऊ शकते, ज्याचे एकूण आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात.

# मुंबई-गोवा महामार्गावर दरड कोसळली

## काही काळ वाहतूक ठप्प

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरानजीक मुंबई-गोवा महामार्गावर तालुक्यातील नडगाव गावाच्या हद्दीमध्ये रविवारी (दि. २३) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास दरड कोसळल्याची घटना घडली. त्यानंतर गोव्याकडे जाणारी वाहतूक काही काळ बंद करण्यात आली होती. दरडीचे मोठे तुकडे रस्त्यावर कोसळल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या घटनेमध्ये कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाली नाही.

महामार्गावर दरड कोसळल्याची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, महामार्ग विभागाचे कर्मचारी तसेच एल अँड टी कंपनीचे कामगार तातडीने घटनास्थळी दाखल झाले. रस्त्यावर आलेली दरड हटवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले. अवघ्या अर्ध्या तासात दरडीचे तुकडे बाजूला काढण्यात आले व मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. वाहतूक सुरू करण्यात आल्यानंतर सावधगिरी म्हणून पोलिसांनी तालुक्यातील मोहोप्रे या गावापासून महामार्गावरील वाहतूक वळवली होती. संबंधित यंत्रणा व प्रशासनाने केलेल्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.



सकाळपासून मुसळधार पावसाच्या सरी कोसळत असताना डोंगरउतारावरून थोड्याफार प्रमाणात माती आणि दगड रस्त्यावर येत होते. पाऊस वाढल्यानंतर माती पाण्याबरोबर येण्यास सुरुवात झाली. डोंगरकपारीतील छोटे छोटे दगड येण्यास सुरुवात झाली, पावसामुळे दगड कोसळण्याचे प्रमाण वाढले. हा प्रकार स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास येताच त्या मार्गावरील वाहतूक थांबवण्यात आली.

सकाळी ज्या भागातून दरड कोसळण्याची घटना घडली, त्या भागातून पावसाळ्यामध्ये सातत्याने दरड कोसळण्याच्या घटना घडत असल्याने महामार्ग विभागाने योग्य ती खबरदारी घेऊन पावसाळ्यामध्ये दरड कोसळणार नाही अशा स्वरूपाचे बांधकाम केले होते. तरीही थोड्या फार प्रमाणात दरड कोसळण्याच्या घटना घडत असल्याने वाहनचालकांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## केपी धबधब्यावर पर्यटकांची जीवघेणी स्टंटबाजी

**खालापूर : प्रतिनिधी**

नुकताच ४ ऑगस्ट रोजी ठाणे येथील तरुण केपी धबधब्यावरून कोसळून ठार झाला, तर ९ जुलै रोजी तीन जण जखमी झाल्याची घटना ताजी असतानाच रविवारी (दि. २३) केपी धबधब्यावर शेकडो पर्यटक जीव धोक्यात घालून स्टंटबाजी करतानाचे चित्र समोर आले आहे. मुंबई-पुणे लोहमार्गावरील बोरघाटातील केपी धबधब्यावर रविवारी शेकडो पर्यटक दाखल झाले.

नदीनाले, गर्द झाडी, निमुळत्या आणि पावसाच्या पाण्याने निसरड्या झालेल्या पायवाटा ओलांडून सर्वांत भयानक ठिकाण म्हणजे केपी धबधब्यावर जाताना कर्जत-



लोणावळा-खंडाळा लोहमार्ग लागतो. या मार्गावर कधीही प्रवासी किंवा मालगाडी धडधडत येते. समोर गाडी आलीच तर बाजूला खोल दरी असून जीव वाचवण्यासाठी कोणताही पर्याय नाही. लोहमार्ग दुरुस्तीसाठी उभारलेल्या कॅटवॉक पुलाचाच आधार असून मोठ्या संख्येने पर्यटक जमा झाल्याने रेल्वे रुळ सोडून उभे राहण्याची क्षमता अपुरी पडते. अशा अवस्थेत अपघाताची दाट शक्यता आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नेरळ फोटोग्राफर्सचे आरोग्य शिबिर



**नेरळ : प्रतिनिधी**

रायगड हॉस्पिटल, नेरळ फोटोग्राफर्स असोसिएशन आणि कर्जत तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जुमापट्टी येथील माणगाववाडी आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

नेरळ फोटोग्राफर्स असोसिएशनने कॅमेऱ्याच्या माध्यमातून समाजाचे चित्र जपण्याबरोबरच समाजसेवेचाही आदर्श निर्माण केला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेले हे मोफत आरोग्य शिबिर अत्यंत स्तुत्य असून अशा उपक्रमांमुळे दुर्गम भागातील मुलांना मोठा आधार मिळतो, असे गौरवोद्गार जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे यांनी काढले. शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तगट तपासणी तसेच आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आरोग्य सेवा मोफत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी नेरळ फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष चेतन केळकर म्हणाले, फोटोग्राफी केवळ आमचा व्यवसाय नसून समाजाप्रति असलेले कर्तव्यही आहे. आरोग्य, शिक्षण व जनजागृती क्षेत्रात नेरळ फोटोग्राफर्स भविष्यातही समाजोपयोगी उपक्रम राबवत राहतील. कार्यक्रमास विश्वस्त माधवराव गायकवाड, संजना भुईसान, शमा देसाई, जान्हवी पाटील, श्रुती रसाळ, कर्जत तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे शेखर बोराडे तसेच शाळेचे शिक्षक, नेरळ फोटोग्राफर्स असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तासगावकर फार्मसी महाविद्यालयाचा दीक्षांत सोहळा उत्साहात

**नेरळ : प्रतिनिधी**

हातात पदवी, डोळ्यांत भविष्याची स्वप्ने आणि फार्मसी क्षेत्रात समाजासाठी योगदान देण्याची उमेद अशा उत्साही वातावरणात सरस्वती एज्युकेशन सोसायटीच्या यादवराव तासगावकर इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, भिवपुरी येथे शनिवारी (दि. २२) दीक्षांत समारंभ उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या या सोहळ्यात पदवीधर विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. मान्यवर, प्राध्यापक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नंदकुमार तासगावकर यांच्या प्रेरणेने आणि संयुक्त सचिव वंदना तासगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला जीवनसेन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संचालक अरिंदम बॅनर्जी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी ज्ञान, कौशल्य, नैतिक मूल्ये आणि समाजाप्रति असलेल्या जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित केले. फार्मसी क्षेत्र थेट मानवी आरोग्याशी संबंधित असल्याने विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या आरोग्यसेवेसाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी तपन कुलकर्णी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच सरस्वती एज्युकेशन सोसायटीच्या कॉर्पोरेट विकास विभागाच्या संचालिका मृदुल तासगावकर कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या प्राचार्या रुपाली तासगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. पदवी स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या चेहऱ्यावरील अभिमान हा सोहळ्याचा विशेष आकर्षणबिंदू ठरला.

पदवी मिळणे हा शिक्षणाचा शेवट नसून जबाबदारीच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे, या भावनेतून विद्यार्थ्यांना पुढील व्यावसायिक जीवनासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. दीक्षांत समारंभाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्याबरोबरच त्यांच्यात सामाजिक बांधिलकी, आत्मविश्वास आणि भविष्यात काहीतरी वेगळे करण्याची प्रेरणाही निर्माण केली.

## ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर रसायनीत शांतता कमिटीची बैठक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आगामी ईद-ए-मिलाद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी रसायनी पोलीस ठाण्यात शनिवारी (दि. २२) सायंकाळी शांतता व मोहल्ला कमिटी सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत ईद-ए-मिलाद उत्सव शांततेत, सलोख्याच्या आणि सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करण्याबाबत पोलीस प्रशासनाकडून आवश्यक सूचना देण्यात आल्या.

मिरवणुकीदरम्यान शिस्त व शांतता राखणे, कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे, अफवा अथवा चुकीच्या माहितीवर विश्वास न ठेवणे, तसेच सोशल मीडियावर आक्षेपार्ह किंवा अफवाजनक संदेश प्रसारित न करण्याचे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी केले. तसेच ध्वनिक्षेपकासह शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करावे. कोणताही अनुचित प्रकार किंवा संशयास्पद घटना निदर्शनास आल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या.

ईद-ए-मिलाद उत्सव शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडण्यासाठी सर्वांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. बैठकीस शांतता व मोहल्ला कमिटीचे एकूण १५ सदस्य उपस्थित होते.




### कागदपत्रे हरविलेबाबत

मी, श्री. शोभा रमेश गोडा , रा. सेक्टर ३, फ्लॅटनं १२ नकुल सोसायटी नवीन पनवेल, जि. रायगड.

माझेकडून मुंबई प्रवास करित असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी खांदेश्वर शहर पोलीस ठाणे येथे मिसिंग केस केली असून, त्याचा मिसिंग रजि. नं. qLeWohvRY8 दिनांक. 13/06/2026 रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांच्याकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. शेअर सर्टीफिकेट

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. 9773529763 वर संपर्क साधावा.

दिनांक : 23/08/2026

**सही/-**
(शोभा रमेश गोडा)


## शेतकऱ्यांना घरबसल्या खत बुकिंगची सुविधा

२५ ऑगस्टपासून ॲप होणार सुरू

**महाड : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना आता घरबसल्या खत बुकिंग करता येणार असून केंद्र शासनाच्या कृषी विभागामार्फत रायगड जिल्ह्यात 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' ही नवीन प्रणाली २५ ऑगस्टपासून सुरू होत आहे. या प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

या प्रणालीमुळे खताची उपलब्धता, बुकिंग आणि खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक होणार आहे. शेतकऱ्यांना खत आहे की नाही हे पाहण्यासाठी कृषी केंद्रावर फेऱ्या मारण्याची गरज राहणार नसून मोबाईल ॲपद्वारे युरिया, डीएपीसह इतर अनुदानित खतांचे बुकिंग करता येणार आहे.शेतकऱ्यांनी मोबाईलवर 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' ॲप डाउनलोड करून फार्मर आयडी, आधार कार्ड आणि जमिनीची माहिती भरावी. फार्मर आयडी नसल्यास आधार क्रमांकाद्वारेही बुकिंग करता येईल.लॉगिननंतर आवश्यक खताची आणि जवळच्या कृषी केंद्राची निवड करता येईल.

बुकिंग पूर्ण झाल्यावर QR कोड किंवा टोकन क्रमांक मिळेल. तो घेऊन संबंधित केंद्रावर जाऊन खत खरेदी करता येईल. QR कोडची वैधता दोन दिवस असेल. या कालावधीत खत न घेतल्यास बुकिंग रद्द होऊन पुन्हा बुकिंग करता येईल. स्वतः जाता येत नसल्यास प्रतिनिधीमार्फत खत घेण्याचीही सुविधा आहे.अडचण आल्यास तालुका कृषी अधिकारी, गुणनियंत्रण निरीक्षक, पंचायत समिती कृषी अधिकारी किंवा कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांनी सांगितले.

## केएमसीमध्ये एनसीसी कॅडेट्ससाठी व्याख्याने

**खालापूर : प्रतिनिधी**

केटीएसपी मंडळाच्या सहकार्याने केएमसी कॉलेज, खोपोली येथे ५ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन, मुंबई ए अंतर्गत एनसीसी कॅडेट्ससाठी ड्रिल प्रशिक्षण तसेच विविध जनजागृतीपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास केटीएसपी मंडळाचे अध्यक्ष दिलीप पोरवाल, जंगम आणि केटीएसपीचे सचिव किशोर पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. केएमसी कॉलेजचे प्राचार्य मकरंद वझल आणि उपप्राचार्य सूर्यवंशी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन एएनओ कॅप्टन शीतल कृष्णा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ड्रिल प्रशिक्षणाने झाली. त्यानंतर लैंगिक अत्याचार व महिलांची सुरक्षितता या विषयावर रीना गायकवाड यांनी जनजागृतीपर व्याख्यान घेतले. त्यांनी कॅडेट्सना लैंगिक अत्याचारापासून बचाव, कायदेशीर बाबी आणि सुरक्षिततेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यानंतर सायबर सिक्युरिटी विषयावर एपीआय संदीप पाटील यांनी मार्गदर्शन केले. सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण याबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

तिसऱ्या सत्रात लायन्स क्लबच्या शिल्पा मोदी यांनी कॅडेट्सना सामाजिक जबाबदारी, समाजसेवेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. दरम्यान, कॅडेट कृष्णाई महाडिक हिने एनसीसीच्या चौथ्या वर्षात प्रवेश केल्याबद्दल तिचे विशेष कौतुक करण्यात आले. तिने तिसऱ्या वर्षात ईबीएसबी (एक भारत श्रेष्ठ भारत) कॅम्प यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. तिच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत सर्व मान्यवर व कॅडेट्सच्या उपस्थितीत रँक सेरेमनी आयोजित करण्यात आली. यावेळी तिला ज्युनियर अंडर ऑफिसर (जेयूओ) पदाची रँक प्रदान करण्यात आली. ड्रिल प्रशिक्षण, विविध जनजागृतीपर व्याख्याने आणि रँक सेरेमनी यामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. उपस्थित मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.





सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यःस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नोड _JNPT_ द्रोणागिरी | | | | | | | | |
| १ | JNPT-१५८ | जसखार १७/४२ | २९९/० | ३-६९-० | २३७० चौ.मी. | नोड जे.एन.पी.टी. ब्लॉक क्र. ०४ सेक्टर-०५, भूखंड क्र. १३, क्षेत्र-२३७० चौ.मी. | **अ) कै. जुबेदा खातुन ए. अजिज तुंगेकर उर्फ जुबेदा गुलाम मोहम्मद शेकबिकन (मयत)** १. अशफाक गुलाम मोहम्मद शेकबिकन २. मुन्नवरा बेगम मोहम्मद मुनीर शेकबिकन ३. निलोफर तोहिद अ. सोंडे वारस दाखला क्र. CMA/२५२/२०१६ **अ) कै. अशफाक गुलाम मोहम्मद शेकबिकन (मयत) यांचे वारस** १. निलोफर तोहिद अ. सोंडे वारस दाखला क्र. CMA/२८/२०२१ | सक्षम न्यायालयाने घोषित केलेले वारस पात्र भूधारक **१. मुन्नवरा बेगम मोहम्मद मुनीर शेकबिकन** **२. निलोफर तोहिद अ. सोंडे** यांच्या नावे भूखंड वाटपाचे प्रस्तावित आहे. |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | **३-६९-०** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितानी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण)
सिडको भवन, तळ मजला, भूमि विभाग १२.५०%
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (जेएनपीए)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/२०१/२०२६-२७**

# नवी मुंबईतील वस्त्र पुनर्प्रक्रिया प्रकल्पाला केंद्रीय वस्त्रमंत्री गिरीराज सिंह यांची भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालय अंतर्गत वस्त्र समिती आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सीबीडी बेलापूर येथे सुरू असलेल्या वस्त्र पुनर्प्रक्रिया प्रकल्पास (TRF) केंद्रीय वस्त्र मंत्री.गिरीराज सिंह यांनी भेट देत प्रकल्पातील प्रत्येक बाबीची बारकाईने पाहणी केली आणि बहुउपयोगी अशा या पर्यावरणशील प्रकल्पाची प्रशंसा केली.

केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या वस्त्र समितीच्या माध्यमातून नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहयोगाने राबविलेला सीबीडी बेलापूर नवी मुंबईतील वस्त्र कचरा पुनर्प्रक्रिया प्रकल्प बहुउपयोगी असून यामधून कच-याला कचरा न समजता ती संपत्ती आहे ही गोष्ट सिध्द होते. तसेच कापडी कचरा टाकून दिला न जाता त्याच्या पुनर्वापरातून स्वच्छता कार्याला मोठा हातभार लाभतो. त्याचप्रमाणे सध्याच्या आधुनिक युगाला साजेशा अपसायकल, रिसायकल प्रक्रियेला आणि सर्क्युलर इकोनॉमीला गती मिळते अशा शब्दात केंद्रीय वस्त्र मंत्री गिरीराज सिंह यांनी वस्त्र पुनर्प्रक्रिया केंद्राचे महत्व विशद केले. या उत्तम रितीने



चालणा-या प्रकल्पाचे मॉडेल इतरही शहरात राबविण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल असेही त्यांनी सांगीतले

याप्रसंगी नवी मुंबईचे उपमहापौर.दशरथ भगत, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, नगरसेविका सुरेखा नरबागे, अतिरिक्त आयुक्त डॉ.राहुल गेठे, टीआरएफ प्रकल्पाच्या विभागप्रमुख उपआयुक्त स्मिता काळे, घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ.अजय गडदे, मालमत्ताकर उपआयुक्त डॉ.अमोल पालवे, अति.शहर अभियंता मदन वाघचौडे, बेलापूर सहा.आयुक्त प्रशांत नेरकर उपस्थित होते.

नवी मुंबई शहरापासून अशाप्रकारचे वस्त्र पुनर्प्रक्रिया राबविण्यास प्रथमतः सुरूवात झालेली असून येथे प्रकल्पाला लाभलेली यशस्विता पाहून इतरही शहरांमध्ये हे मॉडेल नजरेसमोर ठेवून अशा प्रकारचे प्रकल्प राबविण्याकडे विशेष लक्ष दिले जाईल व शहर स्वच्छतेमध्ये नवे योगदान देण्यासाठी यापुढील काळात सकारात्मक पावले उचलली जातील असे केंद्रीय वस्त्र मंत्री गिरीराज सिंह यांनी यावेळी सांगितले.

या प्रकल्पामुळे कचरा व्यवस्थापनाला मोठ्या प्रमाणात लाभ होतो त्याचप्रमाणे महिलांनाही रोजगार उपलब्ध होऊन त्यांचे सक्षमीकरण होते ही महत्वाची बाब असल्याचे ते म्हणाले. यावेळी मंत्रीमहोदयांच्या हस्ते टीआरएफ सेंटर मधील पुनर्निर्मित वस्तू विक्रीच्या थ्रिफ्ट स्टोअर सुविधेचा शुभारंभ करण्यात आला.

टीआरएफ प्रकल्पाच्या माध्यमातून कच-यात जाणारा कपडा पुनर्वापरात येत असल्याने कापडाच्या कच-यात घट होते, कच-यात टाकल्या जाणा-या कापडापासून बहुउपयोगी आकर्षक वस्तुंची पुनर्निर्मिती केली जाते तसेच या प्रक्रियेत काम करणा-या स्त्रियांना रोजगार उपलब्ध होतो असे या प्रकल्पाचे तीन महत्वाचे फायदे आहेत.

# नारळी पौर्णिमेच्या स्वागतासाठी नवी मुंबईतील कोळीवाडे सज्ज!

**नवी मुंबई : बातमीदार**

कोळी समाजाच्या सागरी जीवनाशी आणि संस्कृतीशी अतूट नाते सांगणारा नारळी पौर्णिमा उत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, मुंबईसह नवी मुंबईतील कोळीवाड्यात या उत्सवाची लगबग आतापासूनच सुरू झाली आहे. सणाच्या आठवडाभर आधीपासूनच कोळी बांधवांच्या उत्साहाला उधाण आले असून, संपूर्ण कोळीवाडा सणाच्या तयारीत मग्न झाला आहे.

नारळी पौर्णिमा हा कोळी समाजासाठी केवळ धार्मिक सण नाही, तर समुद्राशी असलेले नाते, पूर्वजांनी जपलेल्या परंपरा आणि आपल्या सागरी संस्कृतीचा अभिमान व्यक्त करणारा भावनिक सोहळा आहे. त्यामुळे या सणाची चाहूल लागताच कोळी बांधवांमध्ये एक वेगळाच उत्साह संचारतो. या सणाच्या पार्श्वभूमीवर कोळी बांधव आपल्या होड्यांना रंगरंगोटी करून त्यांना नवे रूप देत आहेत. कुठे होड्यांवर



आकर्षक रंग चढविले जात आहेत, तर कुठे त्यांच्या दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

यावेळी बंदरकिनारी रंगीबेरंगी पताका, झेंडे आणि फुलांच्या सजावटीने होड्या सजवल्या जात असून, समुद्रकिनाऱ्यावर एक वेगळेच चैतन्य पाहायला मिळत आहे. तर, कोळीवाड्यात अनेक ठिकाणी कोळी गीतांच्या नृत्याचे सराव सुरु असून, लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर सणाचा एक वेगळा आनंद दिसून येत आहे. त्यामुळे अनेकांच्या मनात समुद्रदेवतेप्रती कृतज्ञता आणि आपल्या पूर्वजांच्या आठवणी दाटून येतात.

"समुद्र आमचा सखा, होडी आमची सोबती आणि नारळी पौर्णिमा आमचा अभिमान" या भावनेतून 'नारळ सोन्याचा, दिवाळे गावाचा' हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार असून, यंदाही सिद्धी मित्र मंडळ, दिवाळे कोळीवाडा व ग्रामस्थ यांच्या पुढाकाराने नारळी पौर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाच्या निमित्ताने कोळी समाजाची पारंपरिक संस्कृती, सागरी जीवनशैली आणि पिढ्यान्‌पिढ्या जपलेल्या परंपरांचे दर्शन घडणार असल्याचे सिद्धी मित्र मंडळाच्या आयोजकांनी यावेळी सांगितले.

# खारघर हिल महापौर मॅरेथॉनमध्ये आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची यशस्वी धाव



**नवी मुंबई : बातमीदार**

दक्षिण आफ्रिकेतील नामांकित कॉम्रेड मॅरेथॉन, टाटा मुंबई मॅरेथॉन व अनेक प्रतिष्ठेच्या मॅरेथॉन मध्ये यशस्वी सहभाग घेतलेले नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आज सेंट्रल पार्क, खारघर येथे पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयोजित केलेल्या 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन' मध्ये सहभागी होत २१.२ किलोमीटरचे अंतर २ तास २६ मिनिटे २२ सेकंदात पूर्ण केलेआणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदाचा अत्यंत महत्त्वाचा कारभार सांभाळताना आपल्या अत्यंत व्यस्त दिनक्रमातही डॉ. कैलास शिंदे यांनी दररोज पहाटे लवकर उठून धावण्याचा सराव मागे पडू दिला नाही व यामुळे दैनंदिन कामावर कोणताही परिणाम होऊ दिला नाही.

ध्येय, मेहनत व सातत्य या त्रिसूत्रीच्या बळावर शारीरिक तंदुरुस्ती प्रमाणेच आपले लक्ष्य साध्य करण्यासाठी महत्त्वाची ठरणारी जिद्द या धावण्याच्या सरावातून त्यांनी मिळविली आहे. खारघर हिल मॅरेथॉन मधील आणखी एका यशस्वी कामगिरीबद्दल आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# भारतीय बंदर व गोदी कामगार महासंघाची दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक

**उरण : प्रतिनिधी**

भारतीय बंदर व गोदी कामगार महासंघाची दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे संपन्न झाली. या बैठकीत देशातील विविध बंदरांमध्ये कार्यरत कायमस्वरूपी तसेच कंत्राटी कामगारांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीच्या उद्घाटनाची सुरुवात महासंघाचे अध्यक्ष. श्रीकांत राय यांच्या हस्ते महासंघाचा ध्वज फडकावून झाली. त्यानंतर महासंघाचे प्रभारी. चंद्रकांत (अण्णा) धुमाळ, महासचिव सुरेश पाटील आणि राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी. एस. सुरेश, श्री. मुगास्वामी, श्री.आनंदकुमार यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

दोन दिवसीय बैठकीदरम्यान बंदर क्षेत्रातील कायमस्वरूपी व कंत्राटी कामगारांचे वेतन, सेवा-सुविधा, कामाच्या परिस्थिती, कामगारांचे हक्क, सुरक्षा, कल्याण आणि भविष्यासंबंधी विविध महत्त्वपूर्ण प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. देशातील प्रमुख बंदरांमधून आलेल्या महासंघाच्या संघटनांच्या



प्रतिनिधींनी आपले अहवाल, समस्या व सूचना राष्ट्रीय कार्यकारिणीसमोर मांडल्या.

यावेळी प्रमुख बंदरांमधील सर्व नेत्यांनी व्हीओसी बंदर कामगार महासंघाच्या नवीन संघटनेच्या कार्यालयाच्या उद्घाटनाबद्दल अभिनंदन केले आणि संघटनेच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

समारोपाच्या सत्रात राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी कामगार संघटनेच्या एकतेचे आणि शिस्तीचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले, "संघटनेपेक्षा कोणीही मोठे नाही. महासंघ ही केवळ कामगार संघटना नाही, तर कामगारांच्या सन्मानासाठी, कल्याणासाठी, स्वाभिमानासाठी आणि कामगारांच्या उन्नतीसाठी कार्य करणारी एक व्यापक कामगार चळवळ आहे. महासंघाचा कामगार केवळ उत्पादनासाठी काम करत नाही, तर राष्ट्रनिर्माणाच्या कार्यातही महत्त्वपूर्ण योगदान देतो." कामगारांची एकजूट, संघटनेची ताकद आणि कामगारांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीस देशातील विविध बंदरांमधील महासंघाच्या संघटनांचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये जेएनपीए कामगार विश्वस्त रवींद्र पाटील, के. के. विजयन, . गोपी पटनायक, सुधीर तिवरेकर, प्रभाकर उपरकर, . विघ्नेश नायक, श्रेया शेलके,. विशाखा मंजरेकर,. राजलक्ष्मी, अमील चिरलेकर, संजय धांडोल तसेच इतर कार्यकारिणी सदस्यांचा समावेश होता.

# प्रदूषण करणाऱ्या विकासकाला महापालिकेचा दणका

**नवी मुंबई : बातमीदार**

हवा प्रदूषणात होणाऱ्या वाढीसंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांची स्वतःहून दाखल करुन घेतलेली जनहितार्थ याचिका क्र. ३/२०२३ च्या आदेशान्वये धूळ व प्रदूषण रोखण्याकरिता तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु, याबाबत योग्य उपाययोजना केल्या नसल्याचे निदर्शनास आले.

त्यानुसार, दि. २१/०८/२०२६ रोजी मे. अव्हेन्यु सुपरमार्ट लि., भुखंड क्र. ३-1A, सेक्टर १८, तुर्भे, नवी मुंबई ही बांधकाम/विकास कामाची साईट सीलबंद करण्यात आली आहे.

सदर मोहीम आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे आदेशान्वये, अति. आयुक्त डॉ. राहुल गेठे व उपआयुक्त (अतिक्रमण) संजय शिंदे, यांचे मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक आयुक्त, तुर्भे सागर मोरे यांचे नियंत्रणाखाली, तुर्भे विभागातील कनिष्ठ अभियंता विनोद आंचे व इतर अधिकारी/कर्मचारी यांचे उपस्थिती मध्ये करण्यात आली आहे. सदर मोहिमेसाठी अतिक्रमण निर्मूलन पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार आणि अतिक्रमण विभागातील सुरक्षारक्षक देखील तैनात ठेवण्यात आले होते.यापुढील काळात देखील अशा प्रकारे वायू प्रदूषण रोखणेकरिता सर्वच विभागांमध्ये कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.




# अवघ्या चार तासांत चिमुकल्यांनी सर केला गिरनार पर्वत!

**नवी मुंबई : बातमीदार**

वय अवघे ७ ते ११ वर्षे... समोर तब्बल १० हजार पायऱ्यांचे आव्हान! मात्र, या आव्हानाला न घाबरता दिवाळे कोळीवाड्यातील चार चिमुकल्यांनी अदम्य जिद्द, श्रद्धा आणि धाडसाच्या जोरावर गुजरातमधील जुनागड येथील प्रसिद्ध गिरनार पर्वत अवघ्या चार तासांत पायी चढून सर केला. 'अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त'चा जयघोष करत या चिमुकल्यांनी गाठलेले हे शिखर त्यांच्या जिद्दीची आणि धाडसाची प्रेरणादायी कहाणी ठरली आहे.


दिवाळे कोळीवाड्यातील एकविरा मित्र मंडळाच्या वतीने या धार्मिक व साहसी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयुश कोळी (११), श्री कोळी (१०), ग्रीवा बोस (९) आणि दिविशा विशाल कोळी (७) या चारही चिमुकल्यांनी हे आव्हान स्वीकारले. हजारो पायऱ्यांचा खडतर चढ, दमछाक आणि शारीरिक थकव्याची पर्वा न करता त्यांनी दाखवलेली जिद्द व आत्मविश्वास कौतुकास्पद ठरला. इतक्या लहान वयात एवढे मोठे आव्हान यशस्वीपणे पूर्ण केल्याने पंचक्रोशीत या चिमुकल्यांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे.

या पाच दिवसीय प्रवासादरम्यान



गुजरातमधील बेट द्वारका, द्वारका, सोमेश्वर, गंगेश्वर, नागेश्वर तसेच जुनागड येथील गिरनार यांसह विविध धार्मिक व तीर्थक्षेत्रांना भेटी देण्यात आल्या. या प्रवासातून मुलांना धार्मिक संस्कारांसोबतच निसर्ग, अध्यात्म आणि साहसाची अनुभूती मिळाली. विशेष म्हणजे, गिरनारच्या हजारो पायऱ्या चढताना थकवा जाणवत असतानाही या चिमुकल्यांनी आपले ध्येय पूर्ण केले. त्यांच्या या कामगिरीतून एक वेगळा प्रेरणादायी संदेश मिळाला.

दरम्यान, मुलांमध्ये धार्मिक



संस्कारांसोबतच जिद्द, आत्मविश्वास, शारीरिक क्षमता आणि आव्हानांना सामोरे जाण्याची वृत्ती निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. अवघ्या चार तासांत गिरनार सर करून या चिमुकल्यांनी आपल्या धाडसाची अनोखी छाप उमटवली. त्यांची ही कामगिरी केवळ कौतुकाची बाब नसून, आजच्या पिढीतील मुलांसाठी प्रेरणेचा आदर्श आहे, असे मंडळाचे अध्यक्ष दिनेश गझने यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांच्या सुरेल स्वरांनी रंगली गायन स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल, वाशी येथील प्राथमिक मराठी विभागात विद्यार्थ्यांमधील गायनकला, आत्मविश्वास आणि सादरीकरण कौशल्याला वाव मिळावा, तसेच त्यांच्या सुप्त कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने गायन स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुरेल स्वरांनी आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने शालेय परिसर संगीतमय झाला.

अंतिम फेरीतील विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे परीक्षण करून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक निश्चित करण्यात आले. विजेत्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. आपल्या कलेला मिळालेल्या कौतुकामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साहाचे भाव दिसून येत होते.

या प्रसंगी प्राथमिक मराठी विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका राजश्री पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. "अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळते. त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळते," असे त्यांनी सांगितले. तसेच सहभागी सर्व विद्यार्थी आणि विजेत्या विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले.



राम प्रहर

## श्रावणधारा

### आनंदाचा घन

येतसे साजरा | श्रावणाचा मास
आनंद उल्हास | घेऊनिया ||१||
लावूनिया दीप | करूया स्वागत
सणांची रंगत | वाढवूया ||२||
पंचमीचा सण |महत्व नागांचे
मित्र मानवांचे | असती ते ||३||
पुजून जिवती | मातेला सांगावे
दीर्घायुष्य द्यावे | पुत्रपौत्रां ||४||
नारळी पुनव | करण्या पुजन
जाती कोळीजन | सागरासि ||५||
भाऊराया प्रिय | जन्माचा सांगाती
बांधू त्याच्या हाती | राखी प्रेमे ||६||
संदेश कृष्णाचा | दहीहंडी फोडू
एकमेका जोडू | प्रेम भावे ||७||
देखणा निसर्ग | दावी नवलाई
अशी अपूर्वाई | श्रावणाची ||८||
महिना श्रावण | आनंदाचा घन
मोहवितो मन | संपदाचे ||९||



-संपदा देशपांडे,
पनवेल

# भालाफेकीत रोहितचा सुवर्णवेध

## श्रीशंकरची लांब उडीत बाजी



**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

वर्ल्ड ॲथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर सिल्व्हर लेव्हल स्पर्धेत भारतीय ॲथलिट्सनी दमदार कामगिरी करत अनेक पदके पटकावली असून भालाफेकपटू रोहित यादवने सुवर्णवेध घेतला, तर मुरली श्रीशंकरने लांब उडीत विजेतेपद मिळवले. रोहित यादवने अखेरच्या प्रयत्नात ८७.६८ मीटर भाला फेकत वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी नोंदवत पुरुष भालाफेकीचे सुवर्णपदक जिंकले. त्याला १,६०० डॉलरचे बक्षीस मिळाले. यशवीरने ८२.९४ मीटरसह रौप्य, तर श्रीलंकेच्या सुमेधा रणसिंघेने ८०.२९ मीटरसह कांस्यपदक मिळवले.

ग्लास्गो राष्ट्रकुलमध्ये ८१.५६ मीटरसह सातव्या स्थानावर राहिल्यानंतर रोहितचे हे शानदार पुनरागमन ठरले. राष्ट्रकुल रौप्यविजेता मुरली श्रीशंकरने ८.०७ मीटर उडी घेत पुरुष लांब उडीचे सुवर्ण जिंकले. दक्षिण आफ्रिकेच्या दिवान मॅन्युएलने ८.०३ मीटर उडी घेत त्याला कडवी टक्कर दिली. भारताच्या पी. डेव्हिडने ७.७८ मीटरसह कांस्य मिळवले. श्रीशंकरची यंदाच्या हंगामातील सर्वोत्तम ८.३८ मीटर, तर वैयक्तिक सर्वोत्तम ८.४१ मीटर आहे. महिला लांब उडीत एन्सी सोजनने ६.७१ मीटर उडी घेत सुवर्ण पटकावले. दोन महिन्यांपूर्वी याच मैदानावर तिने अंजू बॉबी जॉर्जचा राष्ट्रीय विक्रम मोडला होता.

शैली सिंहने ६.५६ मीटरसह रौप्य, तर मोहम्मदने ६.३१ मीटरसह कांस्य मिळवत भारताने क्लीन स्वीप केला. महिला १०० मीटरमध्येही क्लीन स्वीप झाला. अभिनया राजराजनने ११.३४ सेकंदात सुवर्ण, हरिता भद्राने ११.४६ सेकंदात रौप्य, तर स्नेहा सत्यनारायणने ११.५६ सेकंदात कांस्य मिळवले.अन्नू राणीने ५६.९६ मीटर फेकीसह भालाफेकीत कांस्य मिळवले. पुरुष १०० मीटरमध्ये अनीमेश सहाव्या (१०.३२ सेकंद) व गुरिंदरवीर सिंग नवव्या (१०.३९ सेकंद) स्थानी राहिला. महिला १०० मीटर अडथळ्यात ज्योतीला १३.२४ सेकंदात कांस्यावर समाधान मानावे लागले. गोळाफेकीत करणवीने २०.०६ मीटरसह कांस्य मिळवत तेजिंदरपाल सिंग तूरला तीन सेंटीमीटरने मागे टाकले.

# फिरकीपटू कर्ण शर्माचा क्रिकेटला अलविदा!



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाकडून आणि आयपीएलमध्ये खेळलेल्या ३८ वर्षीय लेग-स्पिनर कर्ण शर्माने क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली असून तो आता प्रशिक्षकपदासाठी उपलब्ध असणार आहे. यूपी टी-२० लीगमध्ये खेळताना कर्णने आपल्या निवृत्तीची घोषणा केली. ईएसपीएन क्रिकइन्फोनुसार तो २५ ऑगस्ट रोजी शेवटचा सामना खेळणार आहे.

दरम्यान, आपल्या निर्णयाबाबत लेग-स्पिनर कर्ण शर्मा म्हणाला की, मला आता निवृत्ती घ्यायची आहे. माझे कुटुंब, बीसीसीआय, रेल्वे, यूपीसीए, आंध्र प्रदेश आणि विदर्भ क्रिकेट असोसिएशनचा मी कायमचा ऋणी राहणार आहे. आता यापुढे मी प्रशिक्षकपद आणि क्रिकेटशी संबंधित इतर जबाबदाऱ्यांसाठी उपलब्ध असेन. लेग-स्पिनर कर्ण शर्मा भारतासाठी शेवटचा सामना २०१४ मध्ये खेळला होता. त्याने कारकिर्दीत एकूण चार आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत, ज्यात एक कसोटी, दोन एकदिवसीय आणि एक टी-२० सामन्याचा समावेश आहे. त्यात त्याने पाच बळी घेतले.

राष्ट्रीय संघात फारशी संधी न मिळाल्या तरी देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याची कामगिरी उत्कृष्ट राहिली. त्याने ९७ फर्स्ट क्लास सामन्यांत २७०, १२३ लिस्ट 'ए' सामन्यांत १५३ आणि १९१ टी-२० सामन्यांत १६८ अशा एकूण ५५१ विकेट्स घेतल्या. आयपीएल कारकिर्दीतील त्याची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे सलग तीन वर्षांत तीन वेगवेगळ्या संघांकडून विजेतेपद मिळवणे.

# हॉकी विश्वचषक २०२६ : नेदरलँड्सकडून भारताचा ३-१ने पराभव

**मुंबई : प्रतिनिधी**

हॉकी विश्वचषक २०२६ मध्ये भारतीय पुरुष संघाने २२ ऑगस्ट रोजी ॲमस्टेलवीन येथील वागेनर स्टेडियमवर यजमान नेदरलँड्सविरुद्ध 'पूल ई'मधील सामना खेळला. या सामन्यात भारतीय हॉकी संघाला ३-१ अशा पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवानंतर स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचण्याचा भारताचा मार्ग अत्यंत कठीण झाला आहे.

सामन्याच्या पहिल्या दोन क्वार्टर्समध्ये दोन्ही संघांना गोल करता आला नाही. नेदरलँड्सने तिसऱ्या क्वार्टरमध्ये गोलचे खाते उघडले आणि अखेरीस सामना ३-१ अशा फरकाने संपला. सामन्यादरम्यान भारतीय संघाला सहा पेनल्टी कॉर्नर्स मिळाले असले तरी त्यापैकी केवळ एका संधीचे रूपांतर गोलमध्ये करण्यात त्यांना यश आले. पहिल्या



क्वार्टरमध्ये भारतीय संघाला एकही पेनल्टी कॉर्नर मिळाला नाही. त्याच वेळी नेदरलँड्सला एक पेनल्टी

### उपांत्य फेरीचा मार्ग कठीण

कॉर्नर मिळाला, परंतु त्यांनाही गोल करण्यात अपयश आले. दुसऱ्या क्वार्टरमध्ये नेदरलँड्सकडून आक्रमक खेळ पाहायला मिळाला. त्यांना तीन पेनल्टी कॉर्नर्स मिळाले, परंतु त्यापैकी एकाचेही गोलमध्ये रूपांतर करण्यात ते अपयशी ठरले.

तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताला सलग दोन पेनल्टी कॉर्नर्स मिळाले, परंतु नेदरलँड्सच्या भक्कम बचावफळीला भेदण्यात त्यांना अपयश आले. भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंग यांनी पेनल्टी कॉर्नर्सवरून केलेले प्रयत्न डच बचावपटूंनी हाणून पाडले, तर काही प्रसंगी चेंडू गोलपोस्टच्या बाहेर गेला.

नेदरलँड्सविरुद्धच्या ३-१ अशा पराभवानंतर भारतासाठी उपांत्यचा मार्ग कठीण झाला. भारताचा पुढील सामना २४ ऑगस्टला अर्जेंटिनाशी होणार आहे. 'पूल ई'च्या गुणतालिकेत भारत शून्य गुणासह चौथ्या स्थानावर आहे. पुढील फेरीसाठी भारताला उरलेले सामने जिंकून इतर सामन्यांच्या निकालांवरही अवलंबून राहावे लागेल.









**खारघर हिल महापौर मॅरेथॉनची चित्रमय झलक**














दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com